# अमृत कुंभ

वर्ष ७ | अंक १ | एप्रिल - मे २०१३ | मूल्य रु. १०/-





# राजयोगिनी दादी निर्मलशांता जी

*अव्यक्त दिवस - १५ मार्च २०१३*

*(श्रध्दा सुमन)*

*दादी निर्मलशांता होत्या, दिव्यतेची प्रतिमूर्ती। पुरुषार्थाने त्यांनी उजळल्या, लाखो आत्म ज्योती।*
*प्रकाशात या आपण सारे, उज्ज्वल जीवन करु। प्रेमभावे त्यांना आपण, श्रध्दांजली अर्पित करु।*

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच ''मन्मनाभव।''

# अमृत कुंभ

● वर्ष ७ ● अंक १ एप्रिल - मे २०१३

फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२ - २५३२ २२ ०८.
मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail : meenakshi.bk@gmail.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) - ४००६०३.
(डी.डी. 'अमृतकुंभ'च्या नांवानेच पाठवावा.)

वार्षिक वर्गणी रु.६०/-
अर्धवार्षिक वर्गणी रु.३०/-
आजीव सभासद वर्गणी रु.१,३००/-

## - अंतरंग -

● राजयोगिनी दादी निर्मलशांताजी - साक्षात दिव्यतेची मूर्ती (संपादकीय) २
● आत्मज्ञानी सदा सुखी ५
● ईश्वरी सेवेचा ध्यास, करी विघ्नांचा विनाश ९
● राजयोग, भावना आणि अन्न १३
● सचित्र सेवावृत्त १५
● आदरणीय भ्राता जगदीशजी १९
● मन जिंकाल तर जग जिंकाल २२
● व्यसनमुक्ती (कविता) २५
● समयानुसार आता बेहदचे वैराग्य यायला हवे २६
● कर्मसिद्धांत व मृत्यु २९

## मुखपृष्ठाविषयी...

पावसाळ्याच्या दिवसात जेव्हा आकाशात काळे ढग जमा होतात तेव्हा सूर्यप्रकाश जमिनीवर पोहचू शकत नाही. परिणामतः सूर्यप्रकाश असूनही काळ्या ढगांमुळे खाली अंधारच असतो. त्याचप्रमाणे परचिंतन, परदर्शन, परमत, देहअभिमान व मनमत यांचे साम्राज्य जर आपल्या मनात असेल तर योगात बसूनही योग लागणार नाही. त्यामुळे या सर्व गोष्टींचा त्याग न करणे, हे सुद्धा श्रीमताचे उल्लंघन होय. कारण या गोष्टी म्हणजे जणू ज्ञानसूर्य परमात्मा व आपल्यात असलेले काळे ढग आहेत. हे काळे ढग ईश्वरी शक्तीरूपी प्रकाश आत्मापर्यंत पोहचू देत नाहीत.

परिणामतः योगात बसले तरी योग न लागणे, योगामध्ये झोप येणे किंवा योगाला बसण्याची इच्छाच न होणे या गोष्टी अनुभवाला येतील. हे सर्व टाळायचे असेल तर रोज ज्ञान-मुरलीचे श्रवण करून, त्यातील ज्ञानाचे मनन-चिंतन करणे अति आवश्यक आहे. त्यामुळे आपोआपच आपल्या बुद्धीत सदा श्रीमत व स्वदर्शनचक्राची स्मृती राहील. फलस्वरूप सहज योगाचा अनुभव येईल तसेच सदा एकरस व श्रेष्ठ स्थिती राहील. -- *प्रकाशक, अमृतकुंभ.*

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु. शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु. मनिषा गोवळकर, ८ श्रीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

संपादकीय...

# राजयोगिनी दादी निर्मलशांताजी साक्षात दिव्यतेची प्रतिमूर्ती

सन १९३६ मध्ये जेव्हा परमात्मा शिव पित्याने प्रजापिता ब्रह्माद्वारे सत्ययुगी सृष्टीच्या स्थापनेचे कार्य सुरु केले तेव्हा परमज्योति परमात्म्याकडे आकर्षित होऊन त्यांच्यावर संपूर्ण समर्पण होणारे जे आदिरत्न आहेत; त्यांच्यातील एक राजयोगिनी दादी निर्मलशांताजी होत्या. त्या ब्रह्माबाबांच्या सुपुत्री असल्याने, त्यांना लौकिक, अलौकिक व पारलौकिक तिन्ही पिता एकातच मिळाले. त्यामुळे त्या एकातच तिन्ही पिता (three-in-one) अनुभव करीत असत. यज्ञ स्थापनेच्या समयापासून त्या आधारस्तंभ होत्या. ममतामयी दादीजी मागील ७७ वर्षापासून साधनारत, तपस्वी जीवन जगत होत्या. दादीजींची ईश्वरावर असलेली अतूट श्रद्धा, विनम्रता, मधुरता, पवित्रता, अनुशासन प्रियता हे गुण आजही सर्वांसाठी अनुकरणीय आहेत. **शिवबाबांनी त्यांचे नाव 'निर्मलशांता' असे ठेवले होते. त्यानुसार त्या सदा निर्मल व शांत स्थितीत राहून, साऱ्या विश्वाला शांतीचे दान देत असत. तसेच या दुनियेपासून परे (उपराम) स्थितीत रहात असत. म्हणून त्यांना सर्वजण 'परदादी' असेही म्हणत.**

दादीजी साक्षात दिव्यतेची प्रतिमूर्ती होत्या. त्यांचे मधुरता व रमणिकता संपन्न सत्यवचन ऐकून लोक सहजच ईश्वरी ज्ञानाकडे आकर्षित होत. परमात्म स्नेहयुक्त त्यांचे बोल वरदानी सिद्ध होत असत. त्यांच्या मुखकमलाद्वारे ज्ञान यज्ञाचा इतिहास ऐकून लोकांचे जीवन बदलून जात असे. त्यांचा निःस्वार्थ स्नेह संबंध-संपर्कात येणाऱ्यांमध्ये उमंग-उत्साह भरत असे. त्यांची निर्मल, कोमलवाणी व शांत-शीतल चेहरा त्यांचे नाव सार्थ करीत असे. अशा या वरदानी मूर्त दादीजींच्या लौकिक व अलौकिक जीवनाचे ओझरते दर्शन, आपण प्रस्तुत लेखातून पाहू या.

### ❑ दादीजींचे लौकिक जीवन

दादीजींचा लौकिक जन्म असाधारण अशा कृपलानी घराण्यात हैदराबाद (सिंध) मध्ये १९१७ मध्ये झाला. लौकिक मध्ये चार बहिणी व दोन भाऊ, यांच्यात त्या तिसऱ्या होत्या. जन्मपत्री अनुसार त्यांचे नाव पार्वती असे ठेवण्यात आले होते परंतु सर्वजण त्यांना प्रेमाने 'पालू' असे म्हणत असत. त्यांच्यात पूजापाठ वा भक्ति-भावाचे संस्कार लहानपणापासून भरले गेले होते कारण जोपर्यंत घरात देवपूजा होत नाही तोपर्यंत काही खायचे नाही, असा त्यांच्या घरचा नियम होता. श्रीगणेश हे त्यांचे इष्ट दैवत होते. गणेश मूर्तीचा शृंगार करायला त्यांना खूप आवडत असे. रोज अर्धातास त्या मनोभावे पूजाअर्चा करीत असत. शाळेत त्यांचे मन फारसे लागत नसे. परंतु दादा लेखराज (प्रजापिता ब्रह्माबाबांचे पूर्वाश्रमीचे लौकिक नाव) यांची मुलगी असल्याचे सर्वांना माहित असल्याने, सर्वजण स्नेह व सन्मान देत असत. विशेषतः टीचर खूपच चांगला व्यवहार करीत असत कारण दादा लेखराज यांना समाजात व शहरात फारच मोठी प्रतिष्ठा प्राप्त होती. ते सोन्या-हिऱ्याचे प्रसिद्ध व्यापारी होते. दादीजींचे बालपण अतिशय आनंदात गेले. घरातील सर्व कामे करण्यासाठी नोकर-चाकर असल्याने, त्यांना घरातील कुठल्याही कामाची सवय नव्हती. तसेच त्यांच्या लौकिक आत्याला मुलंबाळ नसल्याने, त्यांनी पालूला अर्थात दादीजींना दत्तक घेतले होते. त्यामुळे त्यांना डबल सत्कार व सुविद्या प्राप्त होत्या.

लहानपणापासून त्यांच्यात दान-पुण्य करण्याचा विशेष संस्कार होता. त्यांचे वडील रोज त्यांना खर्चासाठी 'पॉकेट मनी' देत असत. त्याचा वापर त्या गरजूंना दान देण्यासाठी करीत असत. एकदा तर त्यांनी एका गरीब ब्राह्मण मातेला आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या दान दिल्या होत्या. तो प्रसंग खूपच रोचक असा आहे.

एकदा दादीजींच्या लहानपणी त्यांच्या घरी एक गरीब ब्राह्मण स्त्री आली होती. ती दादीजींच्या आईला म्हणाली की माझ्या मुलीचे लग्न आहे. त्यासाठी मला पैशांची फार

गरज आहे. तेव्हा त्यांची आई म्हणाली की मी घरच्यांना विचारून तुला उद्या पैसे देईन. हे ऐकून ती स्त्री परत जायला लागली. दादीजी स्वयंपाक घरात उभ्या राहून हा संवाद ऐकत होत्या. त्यांना त्या मातेची दया आली. लगेचच त्या मागच्या दरवाज्याने गेटजवळ आल्या व आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून त्या मातेच्या हातात दिल्या. ती माता मात्र घाबरून गेली. तिला वाटले की या छोट्या मुलीने आपल्याला या बांगड्या दान दिल्या आहेत. परंतु लोक तर मला चोर समजतील. त्यावर दादीजी म्हणाल्या की तुम्ही काही काळजी करू नका. लग्नाच्यावेळी तुम्ही तुमच्या मुलीच्या हातात या बांगड्या घाला. एवढं बोलून दादीजी घरात निघून आल्या. तरीही त्या मातेच्या मनातील अस्वस्थता कमी झालेली नव्हती. शेवटी ती माता दादीजींच्या वडिलांकडे (अर्थात दादा लेखराज यांच्याकडे) त्या बांगड्या परत करण्यासाठी गेली व झालेला सर्व प्रकार सांगितला. तेव्हा त्यांनी देखील मोठ्या आनंदाने त्या मातेला दिलेल्या दानाचा स्वीकार करायला सांगितले. अशा होत्या दया व करुणेच्या मूर्ती दादीजी. पुढे वयाच्या १५ व्या वर्षी म्हणजे सन १९३२ मध्ये त्यांचा विवाह सिंधमधील एका प्रतिष्ठीत घराण्यातील मोतीराम मुखी यांच्याशी मोठ्या थाटामाटात करण्यात आला. त्यांचे वैवाहिक जीवन सुखी व समाधानाचे होते. कुठलीही कमी नव्हती. त्यांना एक मुलगीही झाली होती.

### ❐ दादीजींचे अलौकिक जीवन

सन १९३६ मध्ये जेव्हा दादा लेखराज यांच्या शरीरात निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण झाले तेव्हा त्यांचे नाव शिव परमात्म्याने 'प्रजापिता ब्रह्मा' असे ठेवले व नवविश्वाच्या स्थापनेसाठी त्यांना निमित्त बनवले. त्याक्षणी त्यांच्यातील लौकिकता समाप्त झाली व ते पूर्णतः अलौकिक जीवन जगू लागले. त्यावेळी ब्रह्माबाबां-मध्ये दादीजींना श्रीकृष्णाचा साक्षात्कार होऊ लागला. त्यामुळे त्यांच्याही दृष्टी-वृत्तीत परिवर्तन झाले. त्यांना ईश्वरी ज्ञानाची ओढ लागली. त्या नियमितपणे आपल्या माहेरी सत्संगात येऊ लागल्या. परंतु त्यांच्या सासऱ्यांनी त्याला कडाडून विरोध केला. म्हणून शेवटी त्यांनी आपल्या घरा-दाराचा त्याग केला व यज्ञात समर्पित झाल्या. पुढे त्यांच्या लहान मुलीचे संगोपन त्यांच्या सासूंनीच मोठ्या आनंदाने केले कारण दादीजींच्या सासूदेखील अतिशय धार्मिक होत्या. त्यांच्या मनात ब्रह्माबाबांविषयी खूपच आदर होता. त्यांना त्या भगवान मानत होत्या. अशारीतीने दादीजी सुरुवातीपासून 'नष्टोमोहा स्मृतीर्लब्धा' बनल्या होत्या. विशेष म्हणजे ज्या दादींना घरात पाण्याचा ग्लाससुद्धा नोकर आणून देत असे, त्या यज्ञात समर्पित झाल्यावर गाडी चालवणे, गाडीची सफाई करणे, चपला शिवणे व दुरुस्त करणे, भंडाऱ्यातील मोठ-मोठी पातेली साफ करणे, कोळश्याच्या चुऱ्यात शेण कालवून त्याचे गोळे करणे यासारखी कामे, यज्ञसेवा समजून मोठ्या आनंदाने करीत असत. **यज्ञसेवेविषयी त्यांच्या मनात अतूट निष्ठा होती. ती पाहून ब्रह्माबाबांनी त्यांना वरदान दिले होते की तू जरूर विश्व-महाराणी बनशील.** पुढे १९३६ ते १९५० या १४ वर्षांच्या काळात कराची येथे तपस्या केल्यानंतर ५ मे १९५० रोजी, यज्ञाचे स्थानांतर माउंट आबू (राजस्थान) येथे करण्यात आले.

येथे आल्यानंतर भारतात ठिकठिकाणी ईश्वरी सेवा सुरू झाली. दादीजींनी अमृतसर, दिल्ली, मुंबई इत्यादी ठिकाणी सेवा केल्यानंतर त्या सन १९६४ मध्ये कलकत्त्याला राहू लागल्या. सन १९७० मध्ये संतरी दादीदेखील त्यांच्यासोबत राहू लागल्या.

कधी-कधी लोक दादीजींना विचारीत असत की ब्रह्माबाबांनी तुम्हाला मधुबनमध्ये स्वतःजवळ का नाही ठेवले? तेव्हा त्या म्हणत की जर मला मधुबनमध्ये ठेवले असते तर लोकांनी म्हटले असते की आपल्या लौकिक मुलीला पुढे करण्यासाठी बाबांनी मुख्यालय मधुबनमध्ये ठेवले आहे. वास्तविक मधुबनमध्ये राहिले किंवा बाहेर राहिले तरी आमचे हेच लक्ष्य आहे की आम्हाला सर्व आत्म्यांचे कल्याण करायचे आहे. आपल्या पुरुषार्थात मग्न राहणे हीच मुख्य धारणा आहे.

पिताश्री ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यानंतर देखील लोकांमध्ये आध्यात्मिक जागृती निर्माण करण्यासाठी

दादीजी अविरत शिवध्वजा फडकवित राहिल्या. आधारमूर्त, उद्धारमूर्त व उदाहरणमूर्त दादीजींची त्यागवृत्ती व सहज साधना अनुकरणीय होती. त्यांच्या मुखातून बाहेर पडणारी वाणी दुसऱ्यांना सहजच शिवबाबांचे बनवित असे. साधनेच्या सुगंधाने युक्त त्यांचे आचरण, त्यांचा तेजःपुंज चेहरा व पवित्र दृष्टी दुसऱ्यांना दुःख-दर्द विसरायला लावून, त्यांना अशरीरी स्थितीचा अनुभव करवित असे. **त्यांनी मम्मा-बाबांना फॉलो करून, आपल्या ७७ वर्षाच्या समर्पित जीवनाद्वारे 'भारतमाता' हा गौरव प्राप्त केला होता. दादीजी एका ठिकाणी राहूनही, त्यांच्या दिव्य गुणांचा सुगंध सर्वत्र दरवळत असे. त्यांच्या तपस्येने मधुबन तीर्थ अध्यात्म शक्तीचे केंद्र बनले.** दादीजींच्या स्वभावातील सरलता, निःसंकल्प स्थिती व मधुर बोल हे अध्यात्मासारख्या गंभीर विषयाला अति सहज बनवित असत. दादीजींच्या तपोमय एकनिष्ठ जीवनाला पाहून, अनेकानेक आत्म्यांनी त्यांचे अनुकरण केले व आध्यात्मिक उन्नती प्राप्त केली. त्यामुळे त्या सदा ईश्वरी ज्ञान-यज्ञाच्या उदाहरणमूर्त राहतील. परिणामतः सर्व शक्तिवान शिवबाबा, प्रजापिता ब्रह्माबाबांसमवेत जेव्हा-जेव्हा अवतरित होत, तेव्हा-तेव्हा दादीजींचे गुणगान अवश्य करीत असत. त्यांचा वरदानांनी शृंगार करीत. त्या वरदानांपैकी दिनांक १४/१२/१९८७ रोजी **अव्यक्त बापदादांनी दादीजींना दिलेले विशेष वरदान पुढीलप्रमाणे आहे, 'कोई वरदान रहा ही नही। तो फिर क्या दें? वरदानोंसे ही सजे हुए चल रहे हो। जैसे कहते है ना हाथ घुमाया तो वरदान मिल गया। तो बाप ने तो 'समान भव' का वरदान दिया, इससे सब वरदान मिल गये। जब बाप अव्यक्त हुए तो सभी महारथी बच्चों को 'समान भव' का वरदान मिला ना। सिर्फ सामने वालों को नही, सभी को दिया।'**

दादीजींच्या प्रत्येक पावलात सेवा सामावली होती. त्यांचा चेहरा व त्यांची दृष्टी सर्वांना ब्रह्माबाबांची भासना देत असे. त्यांच्या प्रत्येक कर्मात वा व्यवहारात सेवा होती. त्या कधी मनसाद्वारे सेवा, कधी वाणीद्वारे सेवा तर कधी संबंध-संपर्काद्वारे सेवा करण्यात बिझी असत. त्या निरंतर योगी तसेच निरंतर सेवाधारी होत्या. सर्वजण दादीजींना पाहून खूप खुश होत असत. त्या सदा धनदेवी बनून, सर्वांना अविनाशी ज्ञान, गुण व शक्तीची धनसंपत्ती दान देत असत. ड्रामा अनुसार दादीजींच्या अंतिम काही वर्षात त्यांना शारीरिक व्याधींचा पेपर आला. परंतु त्यांनी योगबळाद्वारे कर्मभोगावर विजय प्राप्त केला. शारीरिक व्याधीचे कुठलेही दुःख त्यांच्या चेहऱ्यावर कधी दिसले नाही. त्यांची स्थिती सदा एकरस होती. **त्यांनी दिनांक १५ मार्च २०१३ रोजी (ब्रह्ममुहुर्तावर) आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व त्या अव्यक्त वतनवासी फरिश्ता बनल्या. अशा या स्नेहमूर्त, गुणमूर्त, वरदानीमूर्त, त्याग-तपस्या-सेवा मूर्त आदरणीय दादी निर्मलशांताजींना सर्व ब्रह्मावत्सांच्या कोटी-कोटी भावसुमनांची पुष्पांजली समर्पित!**

## वाचकांशी हितगुज

● अमृतकुंभ व अमृतकलश या दोन्ही द्वैमासिकांचा विचार करता, सन २०१३-१४ हे मराठी द्वैमासिकाचे २९ वे वर्ष आहे. त्या अनुषंगाने वाचकांकडून अनेक सदिच्छापर संदेश प्राप्त झाले आहेत. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार! यापुढेही असाच स्नेह वृद्धींगत होत राहील अशी खात्री आहे, कारण अमृतकुंभ हे ईश्वरी सेवेचे शक्तिशाली व सहज साधन आहे.

● **काही सेवाकेंद्राकडून एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ करिता 'अमृतकुंभ'ची मागणी अद्याप प्राप्त झालेली नाही तरी संबंधित टीचर्स भगिनींनी फोन, इमेल वा पत्राद्वारे त्वरीत कळवावी ही विनंती. त्याचबरोबर अमृतकुंभद्वारे होणाऱ्या सेवेत अधिकाधिक वृद्धी करण्याचा प्रयत्न करावा.**

तसेच सध्याच्या वाढत्या महागाईमुळे सन २०१३-१४ च्या वर्गणीत पुढीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे. वार्षिक वर्गणी रु. ६०/-, अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/- व आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/- इतकी राहील.

-- ***प्रकाशक, अमृतकुंभ.***

# आत्मज्ञानी सदा सुखी

*-- ब्र.कु गुणवंत पाटील, बिबवेवाडी (पुणे).*

लहानपणी एक गोष्ट वाचली होती, सुखी माणसाचा सदरा. एक राजा अपार धन दौलत, ऐश्वर्य असतानाही सुखी नव्हता. कुणीतरी त्याला सांगितले, राजा, सुखी माणसाचा सदरा घातलास तर तुला सुख मिळेल, राजाने अशा माणसाचा शोध सुरू केला. एका गावात असा एक मनुष्य असल्याचे राजाला समजले. तो एक लाकुडतोड्या होता. राजा त्याच्याकडे गेला. रणरणत्या उन्हात तो एक लाकूड तोडत होता. त्या कडक उन्हातही त्याच्या मुखावर सुखाची चमक व हास्य होते. राजाने त्याचा सदरा मागितला. त्यासाठी भरपूर धन देण्यास तो तयार होता. लाकूडतोड्या मंद हसला, म्हणाला, 'महाराज, मला माझा सदरा तुम्हाला देण्यास काही हरकत नाही. परंतु हा सदरा तुम्ही घालाल का? अहो, या सदऱ्याला पाठच नाही.'

राजा वरमला पण थक्क झाला. राजा समंजस होता. त्यानं गुपित ओळखले. लाकूडतोड्याच्या सुखाचं मर्म त्याला उमजले. सुख मनाची समृद्धी आहे. खरं तर सुखाचा शोध हा एक प्रवास आहे न संपणारा. ती एक साधना आहे. अज्ञानी मनुष्य जीवनात दुःखच पाहतो. त्याला सर्वत्र दुःखच दुःख दिसते. सुख कुठेच दिसत नाही. दुःखाची अनुभूती व वृद्धी हा त्याचा स्थायीभाव होतो. त्यासाठी तो नियती, समाज, एवढंच नव्हे तर परमेश्वरालाही दोषी ठरवतो. आपल्या जीवनातील दुःख संपावे, सुख यावे यासाठी अनेक शुभ-अशुभ कर्मे करतो. दुसऱ्याच्या दुःखात स्वतःचे सुख शोधतो.

परंतु राजा जनकासारखा आत्मज्ञानी समजतो की दुःख हे अनित्य आहे, विनाशी आहे. ज्ञानी फक्त शुभ, श्रेष्ठ कर्माचीच कास धरून, आत्मस्वरूपात स्थित राहून आत्मानंद मिळवतो. अज्ञानी मात्र सुःख-दुःखाच्या द्वंद्वात गुंतून सदा त्रस्त, चिंतीत व दुःखी राहतो. ज्ञानी त्या पलिकडे जाऊन शाश्वत सुखाचा अनुभव करतो. त्याची वाटचाल ही कर्मातीत, जीवनमुक्त होण्यासाठी असते. **ज्ञानी व अज्ञानीत बाह्यतः काही फरक दिसत नाही. अंतर असते ते अंतरंगात. अज्ञानीचे कर्म अहंकार व वासना तृप्तीसाठीच होते. तो उदरभरणातच निमग्न असतो. त्याचा आनंद भोगातच असतो. ज्ञानी ही खातो-पितो. अज्ञानीप्रमाणेच, बाह्यकर्मेही करतो. परंतु तो आतून जागा असतो. अज्ञानी मात्र अंतरंगी निद्रेत असतो.**

तृष्णा ही माणसाच्या अविवेकाची उत्पत्ती आहे. तृष्णा विभिन्न इच्छांना जन्म देते. ही तृष्णाच अज्ञानीचा संसार होते मग घर-दार, धन-दौलत इत्यादी भौतिक गोष्टींची प्राप्ती हेच त्याच्या जीवनाचे कार्य होते. त्याच्या प्राप्तीसाठी तो काहीही करायला तयार होतो कारण तेच त्याचे सुख-निधान असते. मग दगडाच्या देवाला १० रुपयाचा नारळ चढवून, सत्यनारायणाची पूजा करून महासुखाच्या तथाकथित स्वर्गाच्या नंदनवनात रमण्यात तो धन्यता मानतो. हा वेडेपणाच त्याला खऱ्या सुख-शांतीपासून वंचित करतो. अज्ञानी असा अशुद्ध कामनांनी बद्ध होतो.

आत्मज्ञानी मात्र बुद्ध (ज्ञाता) असतो. तो या भौतिक सुखाचा-वासनांचा, कामनांचा त्याग करतो. जीवन बंधनातून मुक्त होण्याचा पुरुषार्थ करीत, जीवनमुक्त स्थिती अनुभवण्यात मग्न होतो. **ज्ञानीच्या दृष्टीने संसार म्हणजे वासनांची, इच्छांची दौड किंवा स्पर्धा असते. अज्ञानी या दौडीत धावतच असतो. होणाऱ्या प्राप्तींनी अतृप्तच राहतो. शेवटी अतृप्त, असंतुष्ट होऊनच मरतो. त्याच्या वासना अतृप्तच राहतात. म्हणूनच संसाराला मृगजळ म्हटले जाते.**

या संसारात दोन वृत्तींचा खेळ चालू आहे. गती-सद्‌गती मिळविण्याचा हा आंधळी-कोशिंबीरीचा खेळ आहे. एक आहे प्रवृत्ती, दुसरी आहे निवृत्ती. प्रवृत्तीत कर्मभोग अटळ आहे कारण कर्मभोग हा कर्माचा परिपाक आहे. आत्मज्ञानीलाही कर्म प्रारब्धापासून मुक्ती नाही. पण ही प्रवृत्ती भोगवादी नाही तर परमात्म्याने सांगितलेली शुद्ध व पवित्र हवी. त्यात वासना, अशुद्ध इच्छांना स्थान

नाही. संसाराबद्दल आस्था पण बेहदचे वैराग्य असलेला प्रवृत्ती बाणा असावा. **पवित्र प्रवृत्ती धर्म मानावा तरच तो संसारी मुक्ती-जीवनमुक्तीचा अधिकारी होईल. त्याचा कर्मभोग हा परमात्म-स्मृतीनेच संपेल. पूर्वजन्मीचे विकर्म, पाप यापासून मुक्तीसाठी ईश्वरीय याद वा योग हाच एकमेव रामबाण इलाज आहे.**

पवित्र प्रवृत्तीचा अर्थ आहे, कमलपुष्प समान जीवन. त्यासाठी संसाराचा त्याग करून वनवास हा मार्ग नाही. याउलट हा कर्मभोग टाळण्यासाठी संसाराचा त्याग करून पळ काढणारा निवृत्त संन्यासी हा पाखंडी वा दांभिक आहे, अशी अष्टावक्राने संभावना केली आहे. हठयोगी हा दृढतापूर्वक इंद्रियदमन करीत असला तरी त्याची आसक्ती संपली, वासना नष्ट झाल्या असे म्हणता येणार नाही. निवृत्तीवाल्यास संन्यासी म्हणता येईल पण ज्ञानी म्हणता येणार नाही. जर तो देहास पहात असेल, पदार्थ, वस्तुत गुंतला असेल मग भले तो गाव सोडून जंगलात रहात असेल तथाकथित जप-तप, पूजा-अर्चा, यज्ञ-याग, योग-साधना करीत असेल असा संन्यासी प्रभूप्राप्तीचा आनंद कसा घेऊ शकेल. जर त्यास प्रभूची सत्य ओळख नसेल, सत्य स्वरूपाचा परिचय नसेल? हठयोग हा बाह्य उपचार आहे. कर्मकांडाची परकाष्ठा करून कशी प्रभू अंतःकरणात प्रतिष्ठा मिळेल? त्यांच्या या प्रभूचिंतनाने, ब्रह्मचिंतनाने, तत्वपूजेने मुक्ती मिळेल हा भ्रम आहे कारण त्यांना अभिप्रेत असलेला तथाकथित मोक्ष मुळातच नाही. ते समजतात मोक्ष म्हणजे ब्रह्मांडात विलिन होणे, ज्योतित ज्योत मिसळणे, जन्म-मरणातून मुक्तता. पण तशी मोक्ष संकल्पनाच नाही. मोक्ष अर्थात सदाकाळची मुक्ती कल्प-काळात नसते तर कल्पांती असते. तिही अविनाशी नसते. हे अविनाशी सत्य परमपित्याने सांगून जीवनमुक्तीची-सदा सुखाची वाट दाखविली आहे.

खरं तर जीवन ही समस्या नाही, पण माणसाने आपल्या चुकीच्या दृष्टिकोनातून ते समस्यास्वरूप बनवले आहे. जसे कोळी स्वतःच जाळे विणतो व त्यात फसतो. तशीच सारी बंधने माणसाने आपल्या कर्मातून निर्माण करून मुर्खांच्या नंदनवनात रमण्यात पुरुषार्थ मानला आहे. याउलट आत्मज्ञान हा बोध आहे. अनुभूति आहे. आत्मज्ञानी जुनी संसार धारणा, मान्यता यांचा त्याग करतो. एका नव्या जगात त्याचा प्रवेश होतो ज्या जगात आनंदाशिवाय दुसरे काही नसते. तो परमात्म ज्ञानी असतो. **आत्मज्ञानी हा संसारात राहतो पण संसार त्यात नसतो. ज्ञानी चिंतन जरूर करतो पण चिंतित होत नाही, दुःखी होत नाही. तो त्याच्या बुद्धीचा मालक असतो. बुद्धी त्याची धनी नसते. ज्ञानी बुद्धीचा यथार्थ प्रयोग करतो. ज्ञानी सृष्टी नियमाच्या अर्थात ड्रामाचा आदर करतो. त्यात बाधा बनत नाही.** जे होत आहे त्यास ड्रामा अर्थात ईश्वरीय अनुशासन समजतो. त्यामुळे त्याच्या जीवनात संघर्ष वा द्वंद्व नसते. तो सदा एकरस राहतो. तो कोणत्याही परिस्थितीत घड्याळाचा लोलक बनत नाही. तथागताने ही म्हटले आहे की वीणेच्या तारा अधिक सैल वा अधिक घश्र नसतात तेव्हाच संगीत स्त्रवते. ज्ञान अधिकतेत नाही तर समत्त्वात, एकरसतेत आहे. ज्ञानीचा आनंद समत्त्वात आहे तर अज्ञानी-अहंकारी अधिकतेत आनंद शोधतो.

प्रशंसेने वा निंदेने ज्ञानी प्रभावित होत नाही. मृत्यूला ज्ञानी स्वाभाविक मानतो. सृष्टीचा नियम वा नियती मानतो त्यामुळे मृत्युसमयी ज्ञानी उद्विग्न होत नाही. ज्ञानी हा सदा मुक्त, सदा राजी, जीवनमुक्त असतो. तो ज्ञानाने प्रभावित नाही तर प्रकाशित होतो. सदा स्वतःला आत्मा समजण्यातच स्वानंद आहे. आत्मज्ञानी यासारखा स्वमान, श्रेष्ठ महिमा कोणती असेल? दुसऱ्याने केलेली स्तुती खोटी असते. एक प्रकारचा धोका असतो. दुसऱ्याने दिलेले तो परतही घेऊ शकतो. त्यामुळे दुसऱ्याच्या प्रशंसेने फुग्यासारखे फुगणे आहे कारण चावी दुसऱ्याकडे आहे. त्यामुळे तुमची हवा तो केव्हाही काढू शकतो. तेव्हा चावी ज्याच्याकडे आहे त्याचे तुम्ही गुलाम झालात. एखाद्या माकडासारखे तो तुम्हाला नाचवील.

**तेव्हा मी आत्मा आहे. परमपित्या परमात्म्याचा अति प्रिय पुत्र आहे. हीच माझी खरी महिमा वा ओळख. ती कोणी हिरावू शकत नाही.** भक्ती, जप, तप, पूजा ही साधने आहेत. आत्मज्ञानानंतर, परमात्म प्राप्तीनंतर त्याचा

काय उपयोग? 'उत्तीर्णेतु गते पारे। नौकायाः किं प्रयोजनम्।' नदी पार झाल्यावर नौका काय कामाची? पूजा पाठ, भक्ती या सर्व विधी आहेत, त्यांचा उपयोग कुणाला? **ज्ञानीचा पुरुषार्थ एकच, आत्मअभिमानी व परमात्म अभिमानी स्थितीचा अनुभव करणे**.

'योगः कर्मसु कौशल्यम्' हे गीतेत सांगितलेले सूत्र योगी, आत्मज्ञानी जीवनात अनुसरतो. फलाची अपेक्षा न करता स्वाभाविक, श्रेष्ठ कर्म करतो. आनंदाने करतो, ईश्वरीय आज्ञा समजून करतो. त्यामुळे तो सदा सुखी, तणावमुक्त, आनंदीत राहतो कारण तो फक्त निमित्त असतो. ज्ञानी आत्म्यासाठी कर्म त्याज्य नाही. कर्तापन त्याज्य आहे. अहंकार त्याज्य आहे. हठयोग त्याज्य आहे, त्यामुळे कर्मबंधन बनत नाही, कारण आत्मा निमित्त आहे, विश्वस्त आहे. असा ज्ञानीच परम सौभाग्यशाली, सदा आनंदाचा अधिकारी आहे. मनाची प्रसन्नता टिकून राहील अशा गोष्टी कराव्यात. कला, साहित्य, संगीत, परमार्थ हाही आनंदमार्ग आहे. 'संतोषः परम सुखम्, जब आवे संतोष धन, सब धन धुरी समान'. खरं सुख संतुष्टतेत आहे.

गडगंज संपत्तीचा धनी असलेल्या सावकाराला आठव्या पिढीची मोठी चिंता होती. या चिंतेने तो आजारी पडला. एकाने त्याला एका साधुकडे जाण्याचा सल्ला दिला. चिंतामुक्तीची आशा ठेऊन सावकार जंगलात त्या साधुकडे निघाला. सावकार मोठा कंजुष होता. परंतु लाभाच्या आशेने एक फळांची करंडी घेऊन तो साधुकडे आला. त्यावेळी साधु ध्यानमग्न होता. सावकाराने मोठ्या भक्तिभावाने साधुला प्रणाम केला. फळांची करंडी पुढे ठेवीत सावकार म्हणाला, 'महाराज, माझी ही छोटीशी भेट स्वीकार करा.'

साधुने डोळे उघडून त्या सावकाराकडे व त्या करंडीकडे एक नजर टाकली. झोपडीच्या कोपऱ्यात ठेवलेल्या एका फळाच्या करंडीकडे इशारा करीत साधु सावकाराला म्हणाला, 'बेटा, दात्याने (ईश्वराने) माझ्यासाठी भोजन पाठविले आहे. तेव्हा आता याची गरज नाही. हो, पण तू कशासाठी आला आहेस? शक्य झाले तर मी तुला मदत करीन.'

साधुच्या उत्तराने सावकाराचा विवेक जागा झाला. त्याने पाहिले की साधुजवळ फळांची एक टोपली असताना त्याला दुसऱ्या करंडीचा मोह झाला नाही. मी मात्र माझ्याकडे गडगंज संपत्ती असतानाही अधिक धनाची आसक्ती ठेवतो व दुःखी होतो. तो साधुच्या पाया पडून म्हणाला, 'महाराज, माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले. आज मला कळले की खरे सुख संतुष्टतेत आहे, त्यागात आहे, हव्यासात नाही.'

आज माणूस अशाच व्यर्थ इच्छांच्या, लोभाच्या मागे पळत आहे. या इच्छा मृगजळासारख्या आहेत लोभाने, स्वार्थाने माणूस आंधळा झाला आहे. Man pines for what is not. जे नाही त्याचा पाठलाग करीत आहे, त्यासाठी झुरत आहे. लोभाएवढीच ईर्ष्या किंवा दुसऱ्याशी तुलनाही दुःखाच कारण आहे. ही तुलना निकोप नसेल तर आपला आनंद, खुषी हिरावून घेते. सुख अनुभवू देत नाही. खरं तर कशाचीही कमी नसताना दुसऱ्याशी तुलना वा स्पर्धा करताना ही त्रुटी दिसू लागते, मग कुसळासारखी खुपू लागते. जर तुलना न करता या भौतिक समृद्धीला महत्त्व दिलं नाही तर खऱ्या सुखाचा, समाधानाचा मार्ग प्रशस्त होईल. आत्मज्ञानी या गोष्टींपासून स्वतःला नेहमी दूर ठेवतो. किंबहुना याची अविद्याच त्याला असते.

**जगत तर सारेच असतात पण कसे जगायचे हे फारच थोड्यांना कळते. आवाज सारेच ऐकतात, पण त्यामागचे संगीत जो शोधतो त्यालाच सुख गवसते. परमात्म्याची स्मृती अर्थात योग हाच आपल्याला विकारांपासून मुक्ती देऊ शकतो. जसे चित्राने चरित्र बनते, तशीच प्रभु स्मृतीने-योगाने आपली स्थिती बनते**. देहभानामुळेच आपण विकारी झालो. देहभानामुळेच आपल्यातील देवत्वच काय मनुष्यत्वही नष्ट झाले. म्हणून हे गमावलेले देवत्व पुन्हा मिळवण्यासाठी आपल्याला विदेही आत्मा समजले पाहिजे. स्वतःच्या वाट्याला आलेले भोग, दुःख यांचे भांडवल करण्यापेक्षा आपल्या वेदना, कामनांचा अंधार दूर करण्यासाठी ज्ञानाचा उजेड तेथे कसा पसरेल याचे चिंतन केले पाहिजे तरच आपल्याला सुखाचे चांदणे पाहता येईल.

परमात्मा हा सर्व सुखाचा स्त्रोत आहे, निधान आहे. त्याचे चिंतन करा. यथार्थ स्मरण करा, त्याच्या शिकवणीचे

मंथन करा. त्याच्या प्राप्तीची साधना अंतरंगाची उपज आहे. जितके अंतरंग विशुद्ध, स्वच्छ, विमल, विशाल, पवित्र तितका पुरुषार्थ यथार्थ. तो खडतर असला तरी आनंदमूलक असतो. परमपिता समोरच आहे. सोबत आहे पण त्याला थोडेसे विसरलात की तो दूर जातो. इतका दूर की दर्शनापलिकडे निजधामी. त्याचा संग जीवनात रंग भरतो. अंतरंगी आनंदाचे तरंग उठतात. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी भाव-स्थिती होते. परमात्म्याला साथी बनवणे मोठी श्रेष्ठ साधना आहे, आनंददायी गोष्ट आहे. **तो खुदा दोस्त म्हणतो, 'माझी दोस्ती सहज आहे. तिच्यासाठी फार मोठा त्याग, मेहनत करावी असेही नाही. फक्त माझ्यावर खरे प्रेम करा. तुमचे माझे धाम एक आहे. मी तुमचा पिताही आहे. मग दुरावा कुठला! पण तुम्ही मायेच्या विनाशी प्रलोभनांना फसता त्यामुळे अविनाशी पित्याच्या खऱ्या मैत्रीला वंचित होता. म्हणून प्रिय वत्सांनो, निरंतर साक्षी स्वरूपाचा अनुभव करा म्हणजे माझ्या साथीची निरंतर अनुभूति कराल.'**

अंतर्मुखी सदा सुखी असे म्हटल जाते कारण जो ज्ञानाचा उपासक असतो तो आत्मअभिमानी असतो. त्याला आत्मदृष्टी असते. तो आत्म्यालाच पाहतो. या उलट बाह्यमुखी अज्ञानीच असतो. आत्मा, परमात्मा, ड्रामा या त्याच्या परिघापलिकडच्या बाबी आहेत. हे त्याच्या इंद्रियप्रधान व्यक्तिमत्वाचे विषयच होऊ शकत नाही. इंद्रिये स्थूल समजू शकतात पण सूक्ष्म त्यांच्या पकडीबाहेरचे आहे.

**आत्मज्ञानच खरे ज्ञान आहे. बाकी सर्व सामान्य ज्ञान आहे. माहिती आहे, विस्तार आहे, जे बाहेरून गोळा होते. ज्ञानी ज्ञानाच्या मनन-चिंतनातून, मंथनातून परमानंदाची अनुभूति करतो. ज्ञानमंथन केलेले ब्रह्माबाबांनाही खूप आवडत असे.** हे जाणून दादी जानकी आपली आठवण सांगतात, मी व इतर बहिणी मुरलीनंतर एकत्र बसून आध्यात्मिक चर्चा करत असू. तर कधी मुरलीतील ज्ञान बिंदूवर चिंतन करत असू. एक दिवस आम्ही अशीच रमणिक चर्चा करीत होतो. ब्रह्माबाबा कराचीच्या क्लिंफ्टन-वरून फेरफटका मारून परतले होते. त्यांनी आम्हाला ज्ञानाच्या चिंतनाचा आनंद लुटतांना पाहिले. तेव्हा ते खूप आनंदीत झाले व म्हणाले, 'प्रिय मुलींनो, तुम्ही आज फार खूष आहात, या आपण झुल्यावर झोके घेऊ या.'

बाबांनी दादींना आपल्या सोबत झुल्यावर बसवले व ते दोघे झोके घेऊ लागले. तो क्षण आनंदाचे भरते यावे असाच होता. बघा, ज्ञानचिंतनातूनही केवढा आनंद घेता येतो. चित्तात संकल्प-विकल्पांचे काहूर निरंतर उठत असते. **खरं तर संकल्प-विकल्पांमुळेच संसार आहे. परंतु आत्मज्ञानी-योगीचे चित्त मात्र विकल्प रहित होऊन शांत असते. त्याचे सारे विकल्प संपलेले असतात, त्यामुळे तो सदा आत्मानंदात मग्न असतो.** असा योगी मग समाजात राहो वा कुठेही जावो, त्याने काही फरक पडत नाही. त्याची सारी तृष्णा संपून जाते. अहंकार संपलेला असतो. तो जाणतो की परमात्मा संघर्षातून नाही समर्पणातून प्राप्त होतो. त्याला जणू एक नवी दृष्टी मिळते. संसार तोच आहे परंतु त्याकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन बदलला. जो संसार आजवर दुःखद वाटे त्याकडे तो आता साक्षी द्रष्टा होऊन पाहू लागतो. खऱ्या सुखाची वाटच जणू त्याला सापडलेली असते. दुसऱ्याच्या सुखाने आपण सुखी होणे हा अमृतविचार त्याच्या रोमारोमात भिनतो.

**तुका म्हणे सुख पराचिये सुखे। अमृत ते मुखे स्त्रवतसे॥**

तसेच आपले सुखनिधान दुसऱ्यांनीही लुटावे, त्याचे वाटेकरी व्हावे ही उदात्त भावना ज्ञानीची असते. त्यामुळे इतरांशी निःस्वार्थ भावाने, माणुसकीने वागतांना आनंदाची कारंजी उडतात. सर्वत्र जणू मोगऱ्याचा सुगंध दरवळतो व सनईच्या मधुर, पवित्र सुरांनी मनाचा गाभारा भरून जातो.

आत्मा-परमात्म्याचे ज्ञान हे सर्वांसाठी आवश्यक आहे कारण प्रत्येकामध्ये प्रगल्भता येण्याची संजीवनी त्यात आहे. प्रपंच आणि परमार्थ जाणतो तोचि समर्थ. ईश्वरीय ज्ञानातून विचारांचे क्षितिज उंचावते. डोळस आस्थेच्या कक्षा रुंदावतात. आत्म-परिक्षणाची दिशा सापडते. परिवर्तन व आत्मविकासाची वाट स्पष्ट होते. याच वाटेने तो सच्चिदानंद आपल्या भावविश्वात प्रवेश करतो. हा सुखानंद म्हणजे अविनाशी कस्तुरीच आहे.

▶ पान क्र. २१ वर

# ईश्वरी सेवेचा ध्यास, करी विघ्नांचा विनाश

*-- ब्र.कु. भगवानभाई, शांतीवन (आबूरोड).*

*मधुबनमध्ये जे ब्रह्मावत्स गेल्या २५ वर्षापासून समर्पित आहेत, त्यांच्यासाठी रौप्य महोत्सव कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता. त्यात ब्र.कु.भगवानभाई यांचाही समावेश होता. त्यानिमित्ताने त्यांनी आपल्या २५ वर्षाच्या समर्पित जीवनातील विशेष प्रेरणादायी अनुभव प्रस्तुत लेखात मांडले आहेत, ते वाचकांना आवडतील अशी खात्री आहे. वास्तविक प्रत्येक समर्पित ब्रह्मावत्साचे जीवन म्हणजे प्रभुप्रेमाची गाथा आहे. त्यामुळे समर्पित सर्व ब्रह्मावत्सांना अमृतकुंभच्या वाचक वर्गातर्फे हार्दिक मंगलकामना! -- **संपादक.***

ईश्वरी सेवेत २५ वर्षांपासून समर्पित असलेल्या बांधवांचा सन्मान समारोह, मधुबनमध्ये करण्यात आला. त्यात माझा देखील समावेश होता. त्यादिवशी सकाळ पासूनच समर्पित जीवनातील अनेक आठवणी माझ्या मनात येत होत्या. माझ्या अलौकिक जीवनाची सुरुवात कशी झाली; त्यात कशी विघ्ने येत गेली. त्यातून मी कसा पार होत गेलो. शिवबाबा कसे गरीबनिवाज आहेत, याचा मला पदोपदी अनुभव येत होता. त्यांच्या श्रीमतावर चालण्यात आपले कसे परमकल्याण आहे, याचा अनुभव मी केला. माझे जीवन अनेक कला, गुण व विशेषतांनी भरपूर होत गेले. फलस्वरूप अनेक आत्म्यांची सेवा करण्यासाठी शिवबाबांनी मला निमित्त बनवले. माझ्या जीवनातील काही प्रेरक असे अनुभव, मी आपल्यासमोर ठेवत आहे.

### ❒ शिक्षणाचा ध्यास

तसा मला रद्दीतून शिवबाबांचा परिचय मिळाला. माझ्या गावात किंवा जवळपास ब्रह्माकुमारीचे सेवाकेंद्र नसल्यामुळे, मला पत्र-पाठ्यक्रमानंतर काय करावे, हे काही समजले नाही. त्यामुळे त्या पत्र-पाठ्यक्रमाची पुस्तके मी पुन्हा-पुन्हा वाचत होतो. दहावीनंतर आय.टी.आय.चा कोर्स करण्यासाठी विटा (सांगली) येथे गेलो असता, योगायोगाने तेथे गीता पाठशाळा सुरू झाली. याचा मला फार आनंद झाला. आय.टी.आय.करत असताना मी रोज मुरली ऐकण्यासाठी गीता पाठशाळेत जाऊ लागलो. मला ईश्वरी ज्ञानाची गोडी लागली होती. तसा लौकिक शिक्षणात देखील माझा नेहमी पहिला नंबर असायचा. प्रत्येक इयत्तेत माझी हजेरी १००% असायची. परंतु **जेव्हा मला ईश्वरी ज्ञान प्राप्त झाले, तेव्हा जणू मला याचा ध्यास लागला. कारण शिवबाबांनी सांगितल्यानुसार या ज्ञानाद्वारेच आपण भविष्यात राजकुमार किंवा राजकुमारी बनणार आहोत; यावर माझा संपूर्ण विश्वास होता. त्यामुळे एकही दिवस मुरली चुकवायची नाही हा माझा नियम अगदी पक्का होता.**

### ❒ अन्नशुद्धीची धारणा

एकदा मी मुरली ऐकली की आपले भोजन जर शुद्ध, सात्विक तसेच योगी व्यक्तीच्या हातून तयार केलेले असेल तरच आपल्या मनामध्ये (विचारांमध्ये) व दृष्टीमध्ये सात्विकता येते. तेव्हा मला वाटले की आपण शुद्ध भोजन सेवन केले पाहिजे. परंतु मी जेथे शिकत होतो तेथे माझा जेवणाचा डबा रोज एस्.टी.ने येत असे. त्यातही बहुतेक वेळा ज्वारीची कोरडी भाकरी असायची. ज्या दिवशी मी भोजनाबद्दल ईश्वरी महावाक्य ऐकले तेव्हा घरी कळवले की मला भोजनाचा डबा पाठवू नका. मी स्वतः माझी व्यवस्था करेन. परंतु माझ्याजवळ पैसे नव्हते तसेच मला भोजन देखील बनविता येत नव्हते. त्यामुळे मी ५-६ दिवस उपाशी राहिलो. त्यानंतर ही गोष्ट गीता पाठशाळेत येणाऱ्या एका माताजींना माहित पडली. तेव्हा त्या माताजींनी मला एक स्टोव्ह, पातेलं, ग्लास, चमचा आणून दिला. त्याचा वापर करून मी आठवड्यातून ३-४ दिवस भात किंवा खिचडी करून खाऊ लागलो. अशारीतीने अन्नाच्या शुद्धीचे पूर्णतः पालन मी केले. पुढे तर ती गोष्ट अंगवळणी पडली. त्याचा परिणाम असा झाला की गेली २५ वर्षे मला शिवबाबांनी भंडाऱ्यामध्ये सेवा

करण्याची सुवर्णसंधी दिली. याबद्दल शिवबाबांचे कितीही धन्यवाद मानले तरी ते कमीच आहेत.

### ❒ ईश्वरी ज्ञान व योगाची उत्कंठा

आय.टी.आय.चा कोर्स पूर्ण झाल्यावर मला नोकरीचे कॉल्स येऊ लागले. परंतु मला ईश्वरी ज्ञान व योग शिकण्याची फारच उत्कंठा होती. त्यामुळे नोकरीसाठी आलेले कॉल्स मी २-३ वेळा फाडून टाकले. तसे पाहिले तर घरची परिस्थिती गरिबीची असल्याने, मला नोकरी करणे गरजेचे होते. परंतु त्यापेक्षाही मला अधिक महत्त्वाची गोष्ट वाटत होती ती म्हणजे ज्ञान-योगाद्वारे अविनाशी कमाई करण्याची. त्यामुळे जेथे सेवाकेंद्र आहे त्याठिकाणी राहून, मिळेल ती नोकरी करायचे मी ठरवले. त्यानुसार मी सांगली येथे गेलो व तेथे एका हॉस्पिटलमध्ये कम्पाऊंडरची नोकरी पकडली तेथील डॉक्टरनी मला ५०० रुपये मासिक वेतन देऊ असे सांगितले. त्यावर मी त्यांना म्हटले की मला फक्त १५० रुपये दिले तरी चालतील कारण या शहरात माझा नोकरी करण्यात मूळ हेतू आहे ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रावर नियमित जाऊन, ईश्वरी ज्ञान-योगाचा अभ्यास करणे. त्यासाठी मला फक्त वेळेची सवलत हवी. मला वाटले होते की मी जर ५०० रुपयाचे वेतन घेतले तर मला सकाळपासून रात्रीपर्यंत याच कामात व्यस्त रहावे लागेल. व्यक्तिगत पुरुषार्थासाठी काहीच वेळ मिळणार नाही. माझी ही ध्येयनिष्ठा पाहून डॉक्टर खूष झाले व त्यांनी सांगितले की तुम्ही तुमच्या सोयीप्रमाणे कामावर येऊ शकता व सेवाकेंद्रावर जाऊ शकता. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये लौकिक सेवा करत असताना, मला नियमितपणे ज्ञान-योगाचा अभ्यास करता आला तसेच ईश्वरी सेवा देखील करता आली. माझ्या योगयुक्त जीवनाचा परिणाम हॉस्पिटलचे डॉक्टर व तेथील वातावरणावर अतिशय चांगला झाला. पुढे मी जेव्हा ते हॉस्पिटल सोडून जाऊ लागलो तेव्हा तेथील डॉक्टर मला म्हणाले की तुम्ही येथून जाऊ नका. परंतु मी त्यांना सांगितले की माझ्या जीवनाचे ध्येय वेगळे आहे. तेव्हा ते डॉक्टर मोठ्या प्रेमाने म्हणाले की तुम्हाला कधीही काही अडचण आली तर तुम्ही माझ्याकडे येऊ शकता. **त्या डॉक्टरांना सुद्धा ईश्वरी ज्ञानाची गोडी लागली होती. काही काळानंतर त्या डॉक्टरांनी आपला स्वतःचा बंगला ईश्वरी सेवेसाठी दिला. इतकेच नव्हे तर आपल्या हॉस्पिटलमध्ये सगळा स्टाफ ब्रह्माकुमारांचा ठेवला. त्यामुळे शिवबाबा म्हणतात त्याप्रमाणे 'हॉस्पिटल-कम-(गॉडली) युनिव्हर्सिटी' चे मॉडेल तेथे पहायला मिळते.**

### ❒ 'हाँ जी' चा पार्ट बजावल्याने दादीजींचा आशीर्वाद

योगभश्रीसाठी निमित्त सेंटरवरून मधुबनला आलो होतो. योगभश्री संपल्यानंतर मला सेवाधारी म्हणून तेथे रहाण्याची संधी मिळाली. त्या संधीचा मी पुरेपूर फायदा घेतला व सतत दोन वर्ष सेवाधारी म्हणून राहिलो. त्यामुळे मधुबन निवासींच्या 'ट्रायल लिस्ट' मध्ये माझे नाव अंतर्भूत करण्यात आले. माझ्याकडे विशेष कोणती कला नसल्यामुळे योगभवन, कुंजभवन व ज्ञानविज्ञान भवन मध्ये पहारा करण्याची व बेड-बिस्तरा सुकविण्याची सेवा देण्यात आली होती. एके दिवशी अचानक दुपारी २ वाजता गुलजार दादीजींनी मला बोलावून घेतले आणि सांगितले की तुला दिल्ली पांडव भवनमध्ये सेवेसाठी जायचे आहे. तू आताच्या आता तुझे सामान घेऊन ये. परंतु ही गोष्ट तू इतरांना सांगू नकोस. तुझ्या इनचार्ज भाईलाही सांगू नकोस. त्याला आम्ही नंतर सांगू. मला तर खूपच आनंद झाला होता कारण स्वतः बापदादांचा रथ आपल्याला सेवेसाठी दिल्लीला पाठवित आहे. जरूर त्यात आपले कल्याण असेल, हा विचार मी केला. त्यावेळी मी असा विचार केला नाही की मधुबनचे सुंदर वातावरण सोडून, इतका मोठा ब्राह्मण परिवार सोडून तसेच त्यावेळी प्रत्येक आठवड्यात बापदादा दोन वेळा भेटत होते, त्यांना सोडून आपण कुठे चाललो आहोत? मी दादीजींच्या आदेशाप्रमाणे 'हाँ जी' चा पार्ट बजावला व दिल्लीला आलो. खरोखर दिल्ली पांडव भवनमधील सेवेची ८ वर्षे माझ्या जीवनाला फार मोठी कलाटणी देणारी ठरली. गुलजार दादीजी, ऑल राऊंडर दादीजी, आशा बहेन, बृजमोहन भाई, इतर अनेक दादी तसेच विदेशी ब्रह्मावत्सांच्या सान्निध्यात मी खूप काही शिकलो. भोजन बनविण्याची कला, लेखन कला, हिंदी भाषण कला, इंग्रजी संभाषण कला, इकॉनॉमीची

कला, व्यवहार चातुर्य, इत्यादी अनेक गोष्टी शिकलो. मला याची जाणीव झाली की बापदादांनी मला बुद्धूपासून बुद्धिवान बनवले. मुख्य म्हणजे दिल्ली पांडव भवन मधील संघटन लहान असल्याने, मला योग-तपस्या सुद्धा करता आली. **वर्तमान समयी प्राणेश्वर बापदादा माझ्याकडून जी सेवा करवून घेत आहेत ती सर्व जणू दिल्ली येथील वास्तव्य काळातील अनुभव व तपस्येचे फळ आहे, असे मला वाटते.** तात्पर्य म्हणजे मी 'हाँ जी' चा पार्ट बजावला नसता तर बुद्धूच राहिलो असतो.

### ❒ पवित्र रहाण्यासाठी आई-वडिलांकडून मोठ्या युक्तीने परवानगी

ईश्वरी ज्ञान प्राप्तीनंतर माझा हा निश्चय पक्का होता की ईश्वरी सेवा करून आपले जीवन धन्य बनवायचे. कारण ईश्वरी सेवेमध्ये अनेक जन्मांची अविनाशी कमाई सामावलेली आहे. त्याचबरोबर माझा हा देखील विश्वास होता की मी जर विश्वसेवेत लागलो तर शिवबाबांच्या मदतीने घरची परिस्थिती आपोआपच सुधारून जाईल. त्यामुळे मी निश्चिंत होतो. परंतु माझा लौकिक परिवार मात्र खेड्यात राहणारा व अशिक्षित होता. तीन वर्षांनंतर जेव्हा मी दिल्लीहून घरी आलो तेव्हा लहान भावाचे लग्न होणार होते. म्हणून मला सुद्धा वडिलांनी लग्नाविषयी विचारले. मी त्यांना सांगितले की ईश्वरी कार्यासाठी मी स्वतःला समर्पण केले आहे. तेव्हा वडील म्हणाले की लग्न करून मग समर्पण हो. त्यावर मी त्यांना पवित्रतेचे महत्त्व समजावून सांगितले. माझी समजूत काढण्यासाठी वडिलांनी गावातील मोठी मंडळी, नातेवाईक या सर्वांना घरी बोलावले. त्या सर्वांनी मला लग्नाविषयी खूप आग्रह केला. त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर मी पथ-प्रदर्शनीचे पुस्तक काढले व त्यातील चित्रांद्वारे वर्तमान समय कोणता आहे? आपण कोण? परमात्मा कोण? त्याचे आपल्यासाठी काय श्रीमत आहे? या सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. शेवटी मी गावकरी व नातेवाईक मंडळी यांना म्हणालो की 'माझा जन्मदाता पिता म्हणतो, माझ्या म्हणण्यानुसार तू लग्न कर म्हणजे मी ३ एकर जमिनीतील तुझा हिस्सा तुला देईन तसेच झोपडीचा हिस्सा सुद्धा देईन.'

त्यानंतर पथ-प्रदर्शनीच्या पुस्तकातील शिवबाबांचे चित्र दाखवून, **मी सर्वांना सांगितले की 'हा आपला सर्वांचा अविनाशी आत्मिक पिता आहे. तो म्हणतो की तू जर या अंतिम जन्मात पवित्रतेचे पालन केलेस तर मी तुला भविष्य २१ जन्मांसाठी सोन्या-चांदीच्या महालात ठेवीन. विश्वमहाराजा, महाराणी बनवीन, कंचन काया प्रदान करीन, अविनाशी सुख, शांती, संपत्ती व अमरत्व बहाल करीन, सर्वगुणसंपन्न देवी-देवता बनवीन.** तर मग तुम्हीच सांगा की माझा फायदा कशात आहे?' उपस्थित सर्वांनी सांगितले की शिवबाबांचे म्हणणे ऐकण्यातच तुझा जन्मोजन्मीचा फायदा आहे. माझ्या वडिलांनाही त्यांनी समजावून सांगितले की तुझा मुलगा जे करतो आहे ते योग्य आहे. हे सर्व ऐकून वडील गप्प बसले व लग्नाचा विषय बंद केला. परंतु पुढे आणखीनच एक गमतीशीर घटना घडली.

### ❒ मंत्र-तंत्र करणाऱ्या मांत्रिकाला ज्ञान दिले

मी दिल्लीहून एक महिन्यासाठी घरी आलो होतो. त्यामुळे ब्राह्मण जीवनाच्या दिनचर्येनुसार अमृतवेळेचा योग, भोजनापूर्वीचा योग, ट्रॅफिक कंट्रोल, संध्याकाळचा योग, अंतर्मुखतेचा अभ्यास या सर्व गोष्टी नियमित करीत असे. माझं हे वागणं पाहून वडिलांना वाटलं की हा काहीतरी वेगळा प्रकार आहे. हा कोणामध्ये मिसळत नाही. कोणाशी फारस बोलत नाही. त्यामुळे याच्यावर कोणी तरी मंत्र-तंत्र विद्या केली असावी. तेव्हा ते मला एका मांत्रिकाकडे घेऊन गेले. त्याने मला एका रिंगणात बसवले व काही मंत्रांचा जाप केला. त्यानंतर तो वडिलांकडे १५० रुपये मागू लागला. मी म्हटले की हे पैसे कशासाठी? तेव्हा तो मांत्रिक म्हणाला की तुमच्यावर भूताचा असर होता. तो मी दूर केला. तेव्हा मी पथ-प्रदर्शनी काढली व मांत्रिकाला त्यातील चित्रांद्वारे समजावून सांगितले की 'वर्तमान समयी स्वयं परमपिता परमात्मा, भूतेश्वर सर्व मनुष्य आत्म्यांतील पाच भूते (काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार) काढण्यासाठी या सृष्टीवर आले आहेत. त्यासाठी त्यांनी सत्य गीताज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण दिले आहे.' त्या मांत्रिकाला माझे म्हणणे पटले व

त्याने वडिलांना सांगितले की, 'तुमचा हा मुलगा चांगला आहे. भूतं तर तुम्हा-आम्हाला लागली आहेत. तुम्ही तर माझ्यातील भूतं (पाच विकारांची) काढण्यासाठी याला माझ्याकडे घेऊन आलात. त्यामुळे मीच तुमच्या मुलाचा अत्यंत आभारी आहे. अशारीतीने वडिलांचे पूर्णतः समाधान झाले व त्यांनी पवित्र रहाण्यासाठी परवानगी दिली. परंतु आई मात्र माझा पिच्छा सोडत नव्हती.

### ❒ आईला हनुमानाचा साक्षात्कार झाला

मी जेव्हा गावी आलो होतो. तेव्हा टी.व्ही.वर रामायणची सिरियल चालू होती. ती सिरियल मी पाहत होतो. त्यातील हनुमानचा पार्ट मला खूप आवडला होता. त्यामुळे माझ्यात एक स्वमान जागृत झाला, 'मी हनुमान आहे, महावीर आहे, मला विश्वातील अनेक आत्मारूपी सीतांना, रावणाच्या जेलमधून मुक्त करायचे आहे.' मी या स्वमानाचा अभ्यास सुरू केला. याचा परिणाम असा झाला की एके दिवशी खरच आईला हनुमानाचा साक्षात्कार झाला. आई मला म्हणाली की मी तुला बघितले तेव्हा मला हनुमानाचा साक्षात्कार झाला. त्यावर मी आईला सांगितले, 'हनुमान बाल ब्रह्मचारी होता. तसे मलासुद्धा ब्रह्मचारी रहायचे आहे.' त्यानंतर आईने लग्नासाठी माझ्यावर दबाव आणला नाही. त्यानंतर एकदा आईला असेही स्वप्न पडले होते की जर का तुम्ही तुमच्या घरात मांस, मदिरा (दारु) आणली तर तुमच्या घरातून हनुमान निघून जाईल. तेव्हापासून माझ्या घरी मांस, मदिरा, अंडे इत्यादी सर्व गोष्टी बंद झाल्या.

### ❒ नष्टोमोहा बनून विश्वसेवेसाठी समर्पण

एक महिना घरी राहिल्यानंतर मी दिल्लीला जायला निघालो होतो. त्यादिवशी गुरुवार होता. जेथून आम्हाला एस्.टी.मिळते त्या गावचा बाजार होता. त्यामुळे माझे सर्व नातेवाईक, घरातील सर्व मंडळी एकत्र येऊन, तू दिल्लीला जाऊ नकोस असे म्हणत विनवणी करत होती. माझ्या पायातील मोहाची बेडी तोडण्याची ती वेळ होती. त्यावेळी पुढील महावाक्य माझ्या बुद्धीत प्रकट झाले. 'यह सब मरे पडे है। तुझे मोहके वशीभूत होकर अपने कर्तव्य से विन्मुख नही होना है। तुझे अपना कर्तव्य पुरा करने के लिए दिल्ली जरूर जाना है।' अशारीतीने मी नष्टोमोहा बनून विश्व सेवेसाठी समर्पित होण्याकरिता दिल्लीला गेलो.

### ❒ मोबाईलचा वापर करून गावकऱ्यांचा साप्ताहिक कोर्स केला

एके दिवशी मनामध्ये असा विचार आला की पिताश्री ब्रह्माबाबा ज्या घराण्यात जन्माला आले, त्यांच्या संबंध-संपर्कात, नातेवाईकांमध्ये अनेक दैवी घराण्याचे महान आत्मे, दादी-दीदीजी जन्माला आल्या होत्या. तर मग आपण ज्या घरी, ज्या गावी जन्माला आलो, तेथेसुद्धा आपल्या नातेवाईकांमध्ये दैवी घराण्याचे आत्मे जरूर असतील. त्या सर्वांना ईश्वरी संदेश देण्याचा विचार मी पक्का केला. त्यातून मला एक युक्ती सुचली. माझ्या गावात हरिनाम सप्ताह होता. त्यानिमित्त भाविक मंडळी जमत असत. **त्यांचा मी रोज १ तास मधुबनमधून मोबाईलवर कोर्स करीत असे व गावी लाऊड स्पीकर पुढे मोबाईल ठेऊन सर्वजण ज्ञान ऐकत असत. अशारीतीने सात दिवसात मोबाईलचा वापर करून साप्ताहिक कोर्स करण्यात आला. त्यामुळे लोकांची ज्ञानातील रूची वाढली. त्यानंतर लोकाग्रहास्तव गावी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले व तेथे गीता पाठशाळा सुरू झाली.** माझ्या सर्व नातेवाईकाना देखील मी फोनद्वारे, पत्राद्वारे ईश्वरी संदेश दिला. त्यामुळे सुमारे ५० नातेवाईक आज ज्ञानात चालत आहेत. त्या सर्वांच्या मनात हीच खंत असते की आम्ही खूप उशिरा ज्ञानमार्गात चालायला लागलो. त्या सर्वांनी मला सुरुवातीला ज्ञानमार्गात चालण्यासाठी विरोध केला होता. आता ते सर्व या ज्ञानाचा पुरेपूर लाभ घेत आहेत. वास्तविक ही सारी किमया शिवबाबांची आहे.

तुम्हाला आश्चर्य वाटेल की मी ईश्वरी सेवेत समर्पित झाल्याने, माझा लहान भाऊ अशिक्षित असूनही त्याला चांगली नोकरी मिळाली व माझ्या घरची परिस्थिती सुधारली. दुसरी गोष्ट म्हणजे आय.टी.आय.चा कोर्स पुरा केल्यानंतर त्याचे सर्टिफिकेट सुद्धा घ्यायला मी गेलो नव्हतो. मागील वर्षी जेव्हा मला पासपोर्ट काढायचा होता

▶ पान क्र.२५ वर

# राजयोग, भावना आणि अन्न

*-- डॉ.दिलीप कौंडिण्य, निवृत्त प्राध्यापक, सर जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.*

'जसे अन्न तसे मन' अशी मान्यता फार वर्षापासून रूढ झालेली आहे. भावना जेथे निर्माण होतात त्याला मन असे म्हणतात. अन्न पोटात जाते. मग अन्नाचा मनावर परिणाम होतो. हे असे कसे होते? विज्ञानात गुंतलेले मन प्रश्नांची क्यू तयार करू लागले. तथाकथित मान्यतेबद्दल वैज्ञानिक पुरावे शोधू लागले. निराकार शिवबाबांनी, ब्रह्माबाबांच्या शरीराचा आधार घेऊन जे ज्ञान किंवा अंतिम सत्य सांगितले, त्यात अन्नाच्या शुद्धीबाबत बरेच यम व नियम आहेत. मांसाहार तर सोडाच पण कांदा किंवा लसूण देखील वर्ज्य आहे. एवढ्यावरच अन्न शुद्धी थांबत नाही तर अन्न शिजवितांना आणि खातांना देखील मन पवित्र आणि भावना शुद्ध पाहिजेत. हे मुरलीतून साक्षात परमात्म्याच्या महावाक्यांद्वारे कळले आणि नेहमीच्या सवयीप्रमाणे माझे वैज्ञानिक मन भरकटू लागले. प्रश्न उभे करू लागले. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत इतक्या पराकोटीच्या शुद्धतेची गरज आहे की अशी शुद्धता पाळणे कर्मठपणा व कर्मकांड आहे? साक्षात परमेश्वराच्या महावाक्यांबाबत शंका-कुशंका निर्माण करणे फक्त कलियुगी माणूसच करू शकतो. निःसंशय विश्वास ठेऊन पुढील पावले घेण्याऐवजी माझे मन वैज्ञानिक पुरावे शोधण्याच्या खडतर मार्गाकडे वळू लागले. असा खडतर प्रवास अन्य आत्म्यांच्या वाटेला येऊ नये तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनातून अन्नशुद्धीचे हे नियम कसे सत्य आहेत याकरिता प्रस्तुत लेख सादर करीत आहे.

सारस्वत ब्राह्मण असल्यामुळे अज्ञान काळात मासळीचे जेवण म्हणजे 'देवाचा प्रसाद अशी भावना होती. मासळी खातोच आहे तर चिकन, मटण का नाही? यामुळे मनाच्या अशा नकारात्मक प्रवासामुळे मांसाहार करू लागलो. पचनशक्ती वाढविण्याकरिता मदिरा प्राशन घडू लागले. वैज्ञानिक परिषदा (कॉन्फरन्सेस) म्हणजे अशा प्रवृत्तीला खत-पाणी घालणारा आगळा-वेगळा 'कृषिव्यवसाय' होता. मटण-मच्छीचे नुसते नाव काढताच तोंडाला पाणी सुटायचे. असे वाटायचे की, मांसाहार या जन्मी तर सुटणे शक्य दिसत नाही. पण माऊंट आबू येथील मधुबन या तीर्थ-क्षेत्राला जाऊन आल्याबरोबर एक चमत्कार घडला. मांसाहारावरची वासनाच अचानक नाहिशी झाल्याचे माझ्या लक्षात आले. कांदा-लसूण खाणे मात्र सुरू होते. तीन महिन्यांच्या अमृतवेला योगाद्वारे असे लक्षात आले की लसूण-कांदा असलेले अन्न अजिबात पचत नाही. ओकारी देखील कधी-कधी येत असे. जेवण जात नसे. रशियन वैज्ञानिकांनी संकल्प शक्ती वर जे संशोधन केले आहे **त्यावरून निदर्शनास आले की, जस-जशी आत्म्यांतील अशुद्धी योगाग्निद्वारे भस्म होत जाते, आपल्या चैतन्य शक्तीत एक बदल होत जातो. तामसिक-राजसिक-सात्विक स्थितीत स्थित्यंतर होत जाते. सदर सात्विक स्थिती अभक्ष्य भक्षण करू देत नाही. शरीर त्याचा स्वीकार करीत नाही. मग जे मनाला व जिभेला फार कठीण वाटत असते, ते सहज शक्य होऊन जाते.** मधुबन मधील अतिशय शक्तिशाली संकल्पांच्या प्रकंपनामुळे अचानक माझी मांसाहाराबाबतची आसक्ती दूर झाली. फार कठीण असे परिवर्तन सहज झाले. आज पंधरा वर्षांपेक्षा जास्त अवधी-करिता, शिवबाबांनी तो मनोनिग्रह अनुग्रह करून दिला होता. तो मनोनिग्रह नियमित अमृतवेला याद द्वारा अद्याप टिकून आहे. आता मनोनिग्रह ठेऊन युद्ध करावे लागत नाही. सत्ययुगासारखे सहज झालेले आहे.

एका मुरलीत शिवबाबांनी सांगितले, नित्याच्या जीवनात योगाचा प्रयोग विभिन्न समस्यांच्या बाबतीत करून पाहा. याच काळात मधुबन येथे गेलो असता, आदरणीय राजयोगिनी दादी प्रकाशमणि यांच्याकडून विशेष दृष्टीचा प्रसाद मिळाला आणि आणखी एक छोटासा साक्षात्कार झाला. तेथून घरी आल्यावर मनात विचार आला की अन्नाच्या बाबतीत श्रीमत जे काही सांगते, त्या

प्रत्येक गोष्टींबाबत योगाचा व्यक्तिगत प्रयोग करून का पाहू नये? मग तीन दिवस अंडी खाण्याचा प्रयोग केला. तेव्हा असे लक्षात आले की यानंतर चार दिवस अमृतवेला योग नीट लागला नाही. संगमयुगाचा प्रत्येक सेकंद खूप मौल्यवान आहे. त्यामुळे बघा, किती नुकसान झाले? हाच प्रकार कांदा व लसणाच्या बाबतीत घडला. बाहेरचे जेवण घेतल्यावर देखील असाच अनुभव आला. वैज्ञानिक संशोधन करून पुरावे गोळा झाल्यानंतर पाऊले उचलण्या-पेक्षा विश्वास ठेऊन पुढे जाणे जास्त सोपे, जलद व प्रभावी आहे हे लक्षात आले. काम हा खरोखरीच महाशत्रू आहे. अभक्ष्य भक्षण केल्यानंतर किंबहुना त्यामुळेच वृद्धा-वस्थेतही (वयाच्या अडुसष्ट वर्षीदेखील) मती भ्रष्ट होत आहे हे लक्षात आले. बाहेरील खाऊन आल्यानंतर क्रोधाचा अंश अचानक वंश होऊन जात असे. अशा पद्धतीला तार्किक पुरावे असे म्हणतात. **आपल्या देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयात रुग्णांवर योगाचा प्रयोग करून तार्किक पुरावे गोळा केल्यास 'हेल्थ फॉर ऑल बाय ईयर २०२०' चे जागतिक आरोग्य संघटनेने दिलेले घोषवाक्य प्रत्यक्षात अनुभवास येईल**. पण अस्सल भारतीय मन गोऱ्यांचे सोडून कोणाचेच म्हणजे सलमान खान सारखे स्वतःचे देखील ऐकत नाही. आपण उगीचच म्हणतो, की माझे मन फार पापी आहे, मी नाही.

आज वैद्यकीय संशोधनाच्या आधारे, पतंजली ऋषी, चरक संहिता आणि भगवद्‌गीता या सर्व अस्सल प्राचीन भारतीय बाबींना पुन्हा चांगले दिवस आले आहेत. ब्रह्माकुमारीज् ज्ञान, वास्तविक पाहता, क्रिया-योगाचे, पतंजली सूत्र आणि भगवद्‌गीता यातील ज्ञानाचे सहज सोपे आणि शीघ्र प्रभावी मिश्रण किंवा चाटण आहे. एकदा चाखून प्रयोग करीत राहिल्यास हमखास गुण दिसून येतो.

चरक संहिता सांगते, अन्नात दोन घटक असतात. स्थूल घटक पचन क्रियेद्वारे शरीराच्या अन्नमय कोषाला शक्ती देतात, त्याची वाढ करतात. सूक्ष्म घटक अन्न शिजवताना किंवा खाताना ज्या भावना मनात असतील त्याप्रमाणे तयार होतात. हे सूक्ष्म घटक सरळ मेंदूच्या पेशींच्या बरोबर संलग्न होतात आणि त्यात निगडीत असलेल्या भावनेनुसार मनोवृत्ती तयार करतात. उदाहरणार्थ, घरातील स्त्रीने रागात येऊन स्वयंपाक केल्यास घरातील प्रत्येक माणसाच्या मनात रागाचा एक अंश पेरला जातो. याचा अचानक केव्हातरी वंश निर्माण होऊन घरात बॉम्ब स्फोट घडतो. सबब घरातील स्त्रीला नेहमीच खूष ठेवा व त्यांनीही स्वतः खुषीत स्वयंपाक करून घरातील व्यक्तींना खुषीने खाऊ घालावा. **शिवबाबांच्या स्मृतीत ब्रह्माभोजन हे दिलखुष मिठाई समजून खुल्या दिलाने खा आणि दुसऱ्यांना खाऊ घाला. जेवण ग्रहण करताना एकत्रच बसावे व खेळीमेळीचे वातावरण ठेवावे. मन प्रसन्न ठेऊन भोजन करावे**. (परंतु बरेच जण टी.व्ही.सिरियल्स बघतांना जेवण करतात. परिणामी आज प्रत्येक घरात भांडण-तंटे दिसून येतात ते उगीच नाही.) शिवबाबांच्या योगाचा नित्य प्रयोग तर करून पाहा. जास्तीत जास्त तीन महिन्यातच प्रभाव दिसून येतो कारण अन्नाचे सूक्ष्म घटक मनमय कोषाशी संलग्न होतात.

आधुनिक वैद्यकशास्त्र याबाबतीत पूर्णपणे अज्ञानी आहे. मन किंवा मनमय कोष तर आहे पण अत्याधुनिक विज्ञानाला देखील मनमय कोषाचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही. मग परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध कसे करता येईल? 'मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव' असे अजिबात शक्य नाही. प्राणायामामुळे अस्थमा, ॲलर्जी आणि अकारण थकवा दूर होतात असे सिद्ध झाले आहे. सबब प्राणमय कोष निश्चितपणे अस्तित्वात आहे, याचा हा तार्किक पुरावा आहे. आर्युवेद तार्किक पुराव्यांमुळे वाढले. आजार कशामुळे झाला - जीवाणू, विषाणू, किटाणू, स्वतःचे अणू किंवा डॉक्टरांनी दिलेल्या कडक औषधांमुळे झाला? अमुक आजार शरीराच्या कोणत्या पेशी समुहावर काय परिणाम करतो? महागडे इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपी काय दाखविते? अशा विविध चौकशांनी भरलेले एकाहून एक जाड असे ग्रंथ पूर्वीच्या काळी नव्हते. साहजिकच औषधोपचार स्वस्त, मस्त आणि प्रभावी ठरत होते. पाटावर ताठ बसून ताट जेवल्यास आजच्यासारखा

▶ पान क्र. ३१ वर

# दधिची ऋषींप्रमाणे त्याग, तपस्या व निःस्वार्थ सेवेची मूर्ती

# आदरणीय भ्राता जगदीशजी

***-- ब्र.कु. सुभाष भाई, ज्ञानसरोवर (आबूपर्वत).***

आ. भ्राता जगदीशजी सोबत ब्र. कु. सुभाषभाई

*आदरणीय भ्राता जगदीशजींचा जन्म १० डिसेंबर १९२९ रोजी ऋषी-मुनींसाठी प्रसिद्ध शहर मुलतान (जे सध्या पाकिस्तानमध्ये आहे) येथे झाला. त्यांना लहानपणापासून आध्यात्मिकतेची विशेष रूची होती. त्यामुळे त्यांनी भारतीय दर्शन, वैदिक संस्कृती तसेच सर्व धर्मांचे गहन अध्ययन केले होते. त्यांना सन १९५३ मध्ये ईश्वरी ज्ञान प्राप्त झाले. परमात्मा शिव पित्यानेच त्यांना 'संजय' ही उपाधी दिली होती. ते ईश्वरीय विश्व-विद्यालयाचे मुख्य प्रवक्ता होते. त्यांनी राजयोग, मानवी मूल्ये, आध्यात्मिकता यासारख्या विषयावर सुमारे २०० हून अधिक पुस्तके लिहिली. ते विश्व-विद्यालयाच्या तीन पत्रिकांचे (ज्ञानामृत, वर्ल्ड रिन्युअल व प्युरिटीचे) मुख्य संपादक होते.* ***त्यांनी दिनांक १२ मे २००१ रोजी आपल्या पार्थिव शरीराचा त्याग करून, संपूर्ण स्थिती प्राप्त केली. त्यांच्या १२ व्या दिव्य स्मृती दिनानिमित्त सर्व ब्रह्मावत्सांची आदर-पूर्वक श्रद्धांजली !***

***-- संपादक.***

**स्वतः महानतेच्या शिखरावर पोहचून, दुसऱ्यांनाही मार्गदर्शन करणारी थोर विभूती, जिची स्मृती प्रत्येक ब्रह्मावत्सांच्या हृदयात स्थायी रूपाने कोरली गेली आहे. जिच्या गुणांचे वर्णन स्वयं भगवान करीत असत, उंच बांधा, गोरा रंग, तपस्येच्या तेजाने चमकणारा चेहरा, सदा नारायणी नशेत रहाणाऱ्या त्या विभूतीचे नाव होते - जगदीश चंद्र हसीजा.** त्यांनी ईश्वरी ज्ञानावर आधारित २०० हून अधिक पुस्तके लिहून लाखो लोकांचे जीवन परिवर्तन करण्याची ईश्वरी सेवा केली. फलस्वरूप त्यांचे स्वतःचे तसेच आपल्या विश्व-विद्यालयाचे नाव अजरामर झाले. २००८ मध्ये जेव्हा मला कॅन्सरसारख्या भयानक रोगाचा सामना करावा लागला तेव्हा माझे मनोबल कायम ठेवण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या साहित्याची फार मदत झाली. त्यामुळे या थोर विभूतीला माझे शतशः नमन ! सध्याच्या हिंदी ज्ञानामृत मासिकात पहिल्या पानावर प्रकाशित होणारा लेख 'संजय की कलम से' हा भ्राता जगदीश भाईंच्या लेखनाचाच एक भाग असतो. त्यांचे लेखन आत्म्याला दिव्य बनविणारे आध्यात्मिक टॉनिक आहे. प्राणेश्वर शिवबाबांनीच जगदीशभाईंना महाभारतात वर्णित 'संजय' ची उपाधी दिली होती.

**❐ आदरणीय जगदीशभाईंशी माझी पहिली भेट**

जगदीश भाईंच्या व्यक्तिमत्त्वाकडे माझे लक्ष विशेष तेव्हा आकर्षित झाले जेव्हा शिवबाबांनी मुरलीत सांगितले की 'जगदीश बच्चा सर्विस के प्लान अच्छे बनाता है।' हे ऐकल्यावर त्यांना भेटायचे मी ठरवले. तेव्हा जगदीशभाई पांडवभवन जवळील बालभवन मध्ये निवास करीत होते. ते नेहमी एकांतामध्ये रहात असत. ही गोष्ट १९६५ ची आहे, जेव्हा मी २० वर्षाचा होतो. मी जेव्हा त्यांना भेटायला बालभवनमध्ये पोहचलो तेव्हा भ्राताजी लिखाण करण्यात मग्न होतो. त्यामुळे त्यांच्याकडे बराच वेळ दुरून पहात मी उभा राहिलो. सुमारे पाच मिनिटानंतर त्यांचे लक्ष माझ्याकडे गेले. त्यांची दृष्टी पडताच मी हे विसरून गेलो की मला यांच्याशी काय बोलायचे आहे. त्यांनी स्वतःहून मला विचारले की माझ्याशी काही काम आहे का ? तेव्हा आपल्याला भेटण्यासाठी आल्याचे, मी त्यांना सांगितले. त्यांनी मला समोरच्या खुर्चीत बसायला सांगितले व पुन्हा आपले लिखाणाचे काम सुरू केले. मी त्यांचे निरीक्षण करण्याचा आनंद घेत होतो तसेच त्यांच्या वायब्रेशन्सूचा अनुभव करत होतो. दोन मिनिटांनी हातचे काम आटोपल्यावर त्यांनी माझ्याशी बोलायला सुरुवात

केली. सर्वप्रथम त्यांनी विचारले, ‘आपण कोठून आलात?’ तेव्हा मी म्हणालो, ‘महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील गुजरवाडीहून आलो आहे.’ नंतर त्यांनी विचारले की कुठे सेवा करता? मी रोटी विभागात सेवा करीत असल्याचे सांगितले. त्यावर भ्राताजी म्हणाले, ‘ही सेवा खूपच चांगली आहे. शिवबाबांच्या आठवणीत सेवा करण्याची मजा काही आगळीच आहे.’ शेवटी त्यांनी विचारले, ‘काही समस्या आहे का? काही विचारायचे आहे का?’ मी त्यांना म्हणालो, ‘मला कुठलीही समस्या नाही. आपल्याला भेटावेसे वाटले म्हणून मी आलो होतो.’ तेव्हा भ्राताजी उठून उभे राहिले व मला आपल्या मिठीत घेतले. त्यावेळी मला असा अनुभव आला की जणू मी या धरतीवर नाही. **त्यांनी मोठ्या प्रेमाने माझी पाठ थोपटली व मला म्हणाले, ‘भैय्या, बाबा को बहूत प्यार से याद करना!’ आपल्या हाताने त्यांनी माझ्या मुखात टोली भरवली. खरोखर त्यावेळी माझी उपराम अवस्था झाली होती**. त्या महान योगीच्या मीलनाचा माझ्या मनावर फारच खोलवर परिणाम झाला. फलस्वरूप माझ्या समर्पित जीवनातही या गोष्टीचा मला खूप फायदा झाला.

### ❒ वक्तशीरपणा

एकदा भ्राताजी दिल्लीहून माउंट आबूला आले होते. त्यावेळी दादी प्रकाशमणीजींनी हिस्ट्री हॉलमध्ये भ्राताजींना रात्री ९ ते १०चा क्लास करायला सांगितले. दादीजींनी सांगितलेली कुठलीही गोष्ट भ्राताजी टाळत नव्हते. ते आपल्या व्यस्त कारभारातून वेळ काढून, बरोबर ९ वाजता संदलीवर येऊन बसले. लाल लाईट लावून योग सुरू झाला परंतु तेथे केवळ माईक लावणाराच उपस्थित होता. कोणीच उपस्थित नाही, हे पाहून ते सरळ आपल्या रूममध्ये गेले व आपले काम करू लागले. बघता-बघता ही गोष्ट मधुबनमध्ये पसरली की भ्राताजी क्लासमध्ये येऊन परत निघून गेले. या गोष्टींचा सर्वांवर खोलवर परिणाम झाला. त्यामुळे पुढे जेव्हा भ्राताजींचा क्लास असे तेव्हा सर्वजण १० मिनिटं आधी क्लासमध्ये उपस्थित राहू लागले. अशाप्रकारे भ्राताजींनी दादीजींच्या आज्ञेचेही पालन केले होते तसेच वेळेवर क्लासमध्ये उपस्थित राहण्याची शिकवण सर्वांना दिली होती. व्यक्तशीरपणा ही त्यांची फार मोठी विशेषता होती.

### ❒ निर्मानतेची मूर्ती

एकदा सुप्रसिद्ध गायक अनुप जलोटा यांचे पिताजी पुरुषोत्तम जलोटा यांच्या गायनाचा कार्यक्रम ज्ञानसरोवरच्या हार्मोनी हॉलमध्ये चालू होता. माझी सेवा आटोपल्यावर मी देखील हार्मोनी हॉलकडे चाललो होतो. जगदीश भाईजी ट्रान्सपोर्ट विभागासमोर उभे होते. मी त्यांना जवळ जाऊन ‘ॐ शांती’ केले. तेव्हा त्यांनी मला विचारले की पांडवभवन येथून किती दूर आहे? पायी गेले तर किती वेळ लागेल? त्यावेळी रात्रीचे १० वाजून गेले होते. तेव्हा मी त्यांना म्हणालो की रात्रीच्यावेळी पायी जाणे योग्य नाही. मी आपल्या ड्रायव्हरला बोलावून आणतो. तेव्हा ते म्हणाले की महादेव भाईला प्रोग्राम बघण्यासाठी मीच पाठवले आहे. त्याला बोलावू नकोस. तेव्हा माझ्या लक्षात आले की ड्रायव्हरविषयी देखील त्यांच्या मनात किती सहानुभूती आहे. मग मी जाऊन ट्रान्सपोर्ट मधील निमित भाईला ही गोष्ट सांगितली. तेव्हा तो लगेचच गाडी घेऊन आला व त्याने जगदीशभाईंना गाडीत बसायला सांगितले. परंतु भ्राताजी म्हणाले की गाडी भरू दे, मगच आपण जाऊ. गाडी भरेपर्यंत ते गाडीत बसून राहिले. यावरून त्यांच्या मनात असलेली ब्राह्मण परिवाराविषयीची महान भावना स्पष्ट होते. तसेच माझ्या एकट्यासाठी गाडी पाठवायची आवश्यकता नाही, ही निर्मानता दिसून येते.

### ❒ सत्यतेची मूर्ती

भ्राताजी शेवटी जेव्हा खूप आजारी होते तेव्हा एकदा ते क्लासमध्ये सांगत होते, कित्येक ब्रह्मावत्स मला हा प्रश्न विचारतात की शिवबाबा आपल्याला आजारपणात मदत का नाही करत? त्या सर्वांना मी सांगू इच्छितो की बाबा मला प्रत्येक पावलावर मदत करतात. प्राणेश्वर बापदादांनी मला कित्येकदा इशारा दिला होता की तू आपल्या तब्येतीकडे लक्ष दे. वेळेवर जेवत जा. वेळवर झोपत जा. परंतु मला तर ईश्वरी सेवेत दधिचीप्रमाणे हड्डी-हड्डी स्वाहा करायची होती. मी शरीराकडे कधी लक्ष देत नव्हतो. बाबांनी सांगितलेले कार्य पूर्ण करण्यासाठी मी तन-मन संपूर्ण

रूपाने लावत राहिलो. त्यात मला अतिशय आनंद वाटत असे. तो आनंद मी खूप अनुभवला. परंतु त्यामुळे माझ्या शरीराच्या आतील रचनेत बदल होत गेला. तो माझ्या लक्षात आला नाही. वाढत्या वयाबरोबर त्याने विक्राळ रूप धारण केले. हा सगळा माझा दोष आहे. बाबांनी तर मला कित्येकदा सावधानी दिली, परंतु मी काही लक्ष दिले नाही. मग मी बाबांना कसा दोष देऊ शकेन?

### ❐ आज्ञाधारक वृत्ती

त्यादिवशी मधुबन निवासींकरिता जगदीश भाईंचा जणू शेवटचा क्लास होता. प्रकाशमणी दादीजी स्वतः जगदीश भाईंना आपल्या बरोबर घेऊन येत होत्या. जशी आई आपल्या मुलाचे बोट धरून त्याला आणते, असे ते दृश्य होते. भ्राताजींना खूपच अशक्तपणा आला होता. क्लास करताना देखील त्यांचे शब्द धीम्यागतीने तोंडातून बाहेर पडत होते. ते म्हणाले, 'मी क्लास करण्यासाठी नाही परंतु आपल्या प्रिय परिवाराला भेटण्यासाठी आलो आहे. श्री दादीजींची आज्ञा टाळू शकत नाही. तुम्ही माझी खालावलेली प्रकृती पहात आहात.' त्यांनी आपल्या प्रवचनात वैराग्य-वृत्तीवर प्रकाश टाकला. **शेवटी ते म्हणाले, 'मी आपला एक-एक सेकंद, एक-एक श्वास ईश्वरी सेवेत सफल करण्याचा प्रयत्न केला. लवकरच माझे शरीर सुटेल. मला त्याचे जरासुद्धा दुःख नाही. कारण एक दिवस तर सर्वांनाच जायचे आहे.** परंतु तुमच्यासाठी मी एक काम सोडून जात आहे. मी फार प्रयत्न केले, पण मी ते करू शकलो नाही. त्याची मला फार खंत वाटते. बाबांनी आपल्याला एवढं सर्व दिलं परंतु त्यांची छोटीशी आशा मला पूरी करता आली नाही. तुम्ही ती पूरी कराल?' सर्वांनी 'होय' असे सांगितले. ते म्हणाले, 'बस, मी शिवबाबांना प्रत्यक्ष करू शकलो नाही.' त्यापुढे ते बोलू शकले नाहीत. त्यांचे अंतःकरण भरून आले. त्यांच्या समोरून माईक हटविण्यात आला. भ्राताजी उठून उभे राहिले व सर्वांना दोन्ही हात जोडून त्यांनी नमस्कार केला. सर्व मधुबन निवासींचे अंतःकरण देखील भरून आले. आदरणीय दादीजींनी आपल्या मिठीत त्यांना सामावून घेतले आणि सर्वांतर्फे त्यांना आश्वासन दिले की आम्ही सर्वजण शिवबाबांची प्रत्यक्षता अवश्य करू.

### ❐ त्या अंतिम दिवसाची स्मृती

मी माझ्या घरी आईला भेटण्यासाठी गुजरवाडीला गेलो होतो. १२ मे २००१ चा तो दिवस, त्या दिवशी अचानक माझे थोरले बंधु अर्जुनभाई यांचा फोन आला की भ्राता जगदीशजींनी आज शरीर सोडले व ते अव्यक्त वतनवासी झाले. हे ऐकून दोन मिनिट मी स्तब्ध बसलो व मनोमनी त्या महान विभूतीला नमन केले. दुसऱ्या क्षणी मनात विचार आला की त्यांच्या अंतिम दर्शनासाठी जायला हवे. लगेचच मी तयारी केली व बांद्रा स्टेशन गाठले. तेथे अनेक बह्मावत्स मला भेटले. पुढेही प्रत्येक स्टेशनवर ती संख्या वाढत गेली. संपूर्ण भारतातून तसेच विदेशातून ब्रह्मावत्सांचा जणू महासागर मधुबन पावन भूमीवर लोटला होता. स्वयं दादीजींनी आपल्या हातांनी भाईजींच्या पार्थिव शरीरावर अग्नीसंस्कार केले. परंतु आजदेखील त्यांचे जीवन चरित्र, पुस्तकांच्या रूपाने आपले मार्गदर्शन करीत आहे. भ्राताजीं लिखित ईश्वरी ज्ञानाने भरलेला अविनाशी 'अमृत संग्रह' मनुष्याला देवता बनविण्याचे कार्य करीत आहे. **अशा या महान विभूतीला यज्ञसेवेसाठी हड्डी-हड्डी सर्मर्पित करणाऱ्या आदरणीय भ्राता जगदीशजींना १२ मे २०१३ रोजी असलेल्या त्यांच्या १२ व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम! शेवटी मी हेच म्हणेन,**

**शिव पित्याचा मास्टर ज्ञानसूर्य तू।**
**त्याग, तपस्या अन् सेवेची मूर्ती तू।।**
**आध्यात्मिक जगतातील ध्रुवतारा तू।**
**संजय तू, विघ्नहर्ता, विद्यापती ही तू।।**

❖❖❖

---

▶ पान क्र. ८ वरून

हा सुखानंद ज्ञानियांच्या अंतरंगात दडलेला असतो, भरलेला असतो. त्याची अभिव्यक्ती इतरांपर्यंत कशी पोहोचेल ही ज्ञानीची खरी चिंता असते, ध्यास असतो.

**'सारे विश्वचि माझे घर' ही भूमिका असणारा आत्मज्ञानी हा बेहदचा संन्यासीच असतो. म्हणून तो सदा सुखी असतो.**

❖❖❖

# मन जिंकाल तर जग जिंकाल

-- *ब्र.कु. हेमंतभाई, शांतीवन (आबूरोड).*

वा रे मना ! तुझी किती विविध रूपे आणि किती नाना तऱ्हा ! कधी तू फुलपाखरु बनून कला-विशेषतांच्या फुलांकडे आकर्षित होतो व गुणरूपी मकरंद चाखतोस तर कधी विमान बनून कल्पनेच्या आकाशात भराऱ्या मारतोस तर कधी पाणबुडी बनून ज्ञानसागराच्या तळाशी जाऊन ज्ञानरत्ने गोळा करतोस. कधी लहान बाळ बनून अगदी हश्राला पेटतोस तर कधी बेलगाम घोड्यासारखा सैरावैरा धावत सुटतोस. हे मना ! तू कधी समजूतदार बाळाप्रमाणे माझे म्हणणेही ऐकतोस आणि चांगल्या चिंतनात मग्न होतोस. परंतु कधी-कधी तुझ्या कर्तुत्वांचे वर्णन करणे कठीण होते. कधी तू एखाद्या माशीप्रमाणे इतरांच्या दुर्गुणरूपी घाणीवर बसतोस तर कधी तुझ्या स्वच्छंद व बेशिस्त वागणुकीचा कळस होतो. तू असे विचार करतो जे वैऱ्याच्या मनीही येऊ शकत नाहीत म्हणून 'मन चिंती ते वैरी न चिंती' ही लोकोक्ती उगीचच नाही. कधी तू ईश्वर चिंतनात मग्न होतोस तर कधी षड्‌रिपूंच्या जाळ्यात गुरफटतोस व मला मायेचा गुलाम बनवतोस.

खरोखर मानवी मन मोठं विचित्र आहे. त्याला निसर्गाची किमया म्हणावे की ईश्वराचे वरदान कारण मनाद्वारेच इहलोक व परलोकाच्या सर्व प्राप्ती सहज व सुलभरीतीने मिळू शकतात. मन हा विचारांना जन्म देणारा अखंड झरा आहे. मन हे नानाविध विचारांचे निर्मिती केंद्र आहे; जणू काही विचार निर्मितीचा अद्‌भूत कारखाना आहे. रात्रं-दिवस मनात सातत्याने असंख्य विचारांची उलाढाल चाललेली असते. **मनरूपी फॅक्टरीत बरे-वाईट, शुभ-अशुभ, सकारात्मक-नकारात्मक विचारांचे भरघोस उत्पादन होत असते. संधी मिळताच हे विविध विचार, वाणीच्या रूपाने मुखावाटे बाहेर पडतात, वाणीद्वारे व्यक्त केलेले विचार व्यवहारात दिसू लागतात व हळू-हळू आपल्या व्यक्तिमत्वाला आकार मिळत जातो. म्हणून विचारांना जीवनाचे शिल्पकार म्हणणे वावगे ठरणार नाही. खरे म्हटले तर मनातील विचार हेच जीवनाचा आधार होत.**

मानवी मन हे संकल्प शक्तीचे उगमस्थान आहे. संकल्प शक्ती ही स्वतःच एक अद्‌भूत शक्ती आहे. शास्त्रामध्ये देखील ब्रह्माने आपल्या संकल्पाद्वारे सृष्टी रचली, असे मानले जाते. आतापर्यंत विज्ञानाने केलेले चमत्कार हे देखील संकल्प शक्तीचीच किमया आहे. वैज्ञानिकांच्या संकल्प शक्तीद्वारेच धरतीवरच्या मानवाला आकाशात सैरसपाटा करण्याची संधी लाभली. भूगर्भात दडलेल्या अनेक रहस्यांचा उलगडा करता आला. अनेक प्रकारची साधन-संपत्ती निर्माण करता आली. सध्या मानवी जीवनात सुख-साधनांचा जो पाऊस पडत आहे, तो संकल्प शक्तीच्या यथायोग्य प्रयोगांचेच फळ आहे. जमिनीत बीज पेरले की त्यापासून फळ मिळते. त्याचप्रमाणे चांगल्या-वाईट संकल्पांची बीजे मनरूपी धरणीत पेरल्यावर त्यापासून सुख-दुःखाची गोड-कडू फळे अवश्य प्राप्त होतात. म्हणून मनात येणाऱ्या संकल्पांची काळजी घेणे आवश्यक आहे.

**ज्ञानसागर शिवबाबा वेळोवेळी ब्रह्मावत्सांना संकल्प-शक्तीची महती सांगताना म्हणतात, 'मनजीते जगतजीते' अर्थातच मनाला जिंकले तर जगाला जिंकणे सोपे आहे.** आजच्या विज्ञान युगात मनाच्या विज्ञानाचाही सखोल अभ्यास चाललेला आहे. विज्ञान संगत अनेक प्रयोगांनी मनाच्या अफाट व अद्‌भूत शक्तीचे सामर्थ्य सिद्ध केले आहे. आकर्षणाचा सिद्धांत (Law of Attraction) जर पडताळून पाहिला तर ज्याप्रकारचे विचार निर्माण होतात त्याप्रकारचा प्रतिसाद कर्मफळाच्या रूपाने प्राप्त होत असतो, हे अनेक वेळा दिसून आले आहे. आकर्षणाचा हा सिद्धांत पुढील कथेद्वारे सहज लक्षात येईल.

अमरावती राज्याचा राजा रामेश्वर कलाप्रेमी व कलापारखी होता. त्याच्या दरबारी अनेक कलाकारांची मैफिल सजलेली असे. त्याच्या राज्यात सुशील नावाचा एक शिल्पकार होता. नावाप्रमाणेच तो शीलसंपन्न व

चरित्र्यवान होता. त्याच्या शिल्पकलेवर मोहित होऊन, राजाने सुशीलची राजशिल्पकार म्हणून नियुक्ती केली. थोड्याच दिवसात तो त्याच्या उत्तम व्यवहारामुळे राजाचा आवडता दरबारी व मित्र बनला. राजदरबारात त्याला पुरेसा मानमर्तबा मिळू लागला. दिवसामागून दिवस गेले. एकदा सुशीलला चांगल्या दर्जाची संगमरवराची मोठी शिळा मिळाली. ती शिळा पाहून सुशील रोज मनातल्या मनात विचार करू लागला की राजा मेल्यानंतर त्याचा मी अतिशय सुंदर संगमरवराचा पुतळा बनवीन. त्याने मला मुबलक पैसा व किर्ती प्राप्त होईल. रोज राजदरबारात जाऊन आल्यावर तो राजाच्या सुंदर पुतळ्याची आकृती अंतर्मनाद्वारे पाहू लागला. परंतु त्याचा परिणाम मात्र उलटा झाला. राजा सुशीलला भेटून पहिल्या सारखा आनंदित न होता, त्याचा तिटकारा करू लागला. त्याच्या शिल्पकलेत काहीना काही त्रुटी काढू लागला. अचानक झालेल्या राजाच्या वागणुकीतील बदलामुळे सुशील दिवसें-दिवस त्रस्त होत गेला. त्याच्या मानमर्तब्यात कमी येऊ लागली. त्यामुळे तो फार चिंतीत झाला.

तेवढ्यात राज्यात एका मोठ्या संताचे आगमन झाले. तो आपल्या आत्मशक्तीद्वारे अनेकांच्या समस्या सोडवू लागला. सुशील त्या संताकडे आपलं गाऱ्हाण घेऊन गेला. तो म्हणाला, 'महाराज, माझ्या मनात राजाविषयी खूप प्रेम आहे. त्याच्या मृत्युनंतर मी त्याचा सुंदर पुतळा बनविण्याचा विचार करीत आहे. परंतु राजा मात्र आता माझ्याशी तुटक व्यवहार करीत आहे.' त्याची समस्या ऐकून संत म्हणाला, 'तू सतत राजाचा सुंदर पुतळा तयार करण्याचा विचार करीत आहेस म्हणजेच अजाणतेपणी तू राजाचे मरण चिंतीत आहेस व त्याचा गुप्त शत्रू बनत आहेस. त्यामुळे त्या विचारांचे वायब्रेशन्स् राजाच्या अंतर्मना-पर्यंत पोहचत आहेत. त्यामुळे तो तुझ्याशी असा वागत आहे. म्हणून तू राजाकडे जाऊन त्याच्या दिवंगत पूर्वजांचा पुतळा बनविण्याचा प्रस्ताव ठेव अर्थात स्वतःच्या विचारां-मध्ये सकारात्मक बदल कर म्हणजे तुझी समस्या सुटेल.' संताने दिलेला सल्ला सुशीलला पटला. त्याचप्रमाणे त्याने राजाकडे जाऊन राजाच्या पूर्वजांचा पुतळा बनविण्याची कल्पना मांडली. आपल्या पूर्वजांचा पुतळा तयार करण्याचा विचार राजाला एका क्षणात पटला व लागलीच सुशीलला तशी आज्ञा दिली. त्याप्रमाणे पुतळा बनविल्यानंतर सुशीलचा गौरव करून त्याला चांगले बक्षीस दिले. यावरून हे लक्षात येईल की सुशीलविषयी राजाचा झालेला दुराग्रह हा केवळ त्याच्या चुकीच्या नकारात्मक विचारांचे फळ होते. तात्पर्य म्हणजे ज्याप्रकारच्या विचारांचे बी मनरूपी शेतीत पेरले जाईल तसेच फळ प्राप्त होईल. दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्या वा भांडणतंटे हे वास्तविक पूर्वकाळातील आपल्याच नकारात्मक विचारांचा परिणाम असतो. **ज्याप्रकारचे विचार मनात येतात, त्याप्रकारची वृत्ती आणि वायब्रेशन्स उत्पन्न होतात व न्यूटनच्या 'जशी क्रिया तशी प्रतिक्रिया' या नियमानुसार (Law of Action and Reaction) व आकर्षणाच्या नियमानुसार (Law of Attraction) घटना घडू लागतात.** म्हणूनच वर्तमान तीव्र पुरुषार्थाच्यासमयी स्वतःच्या विचारांना संपूर्णतः सकारात्मक बनवणे, ही काळाची गरज आहे. वेळोवेळी शिवबाबा तसा इशारा सर्व ब्रह्मावत्सांना देत आहेत. खर पाहिलं तर हे सखोल मनोविज्ञानच आहे.

बऱ्याच जणांचा हा प्रश्न असतो की मन तर बेलगाम घोड्याप्रमाणे आहे, त्याला आवर कसा घालता येईल? ते मनाची तुलना बेलगाम घोड्याशी करतात. परंतु वास्तविकता त्याहून वेगळी आहे. खरं तर देहरूपी रथाला चालविणारा आत्मा हा सारथी आहे. पंच इंद्रिये हे जणू देहरूपी रथाला जुंपलेले घोडे आहेत. परंतु मनच या घोड्यांना विचारांची गती देते. आपण आत्मा या शब्दाची फोड केली तर 'आत्मा = आत्+मा' अशी होईल. अर्थात शरीररूपी घराच्या आत 'मा' म्हणजे जी आई (आईला हिंदीत मा म्हणतात) राहते ती मनाची आई आहे. म्हणजेच शरीराच्या आत राहणाऱ्या आत्मारूपी आईचे मन हे बाळ आहे. ज्याप्रमाणे बाळ अजाण परंतु तेवढेच चपळही असते, त्याप्रमाणे मनदेखील निरागस बाळाप्रमाणे वागते. मनरूपी बाळाला वळण लावण्याचे काम आत्मारूपी आईचे आहे. समजा एखाद्या बाळाच्या हाती चाकू आला आणि तो चाकूशी खेळण्यात गुंग झाला तर त्याचा परिणाम

काय होईल हे आपण समजू शकतो. चाकूला खेळणे समजणाऱ्या बाळाच्या हातून चाकू काढून घेणं मोठ अवघड आहे. जबरदस्तीने काढून घ्यायचा प्रयत्न केला तर त्याच्या हाताला इजा होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सुजाण माता एखादे सुंदर खेळणे बाळासमोर ठेवील, जेणेकरून बाळ त्या खेळण्याकडे आकर्षित होईल व चाकू आपोआपच टाकून देईल.

### ❒ मनाचे परिवर्तन करण्यासाठी मनाचे दमन वा अमन न करता, मनाला सुमन बनवा

वरील उदाहरणावरून आपल्या लक्षात आले असेल की मनाला योग्य रीतीने चालविण्यासाठी युक्ती आवश्यक आहे. आजवर मनावर ताबा मिळविण्यासाठी दमन वा अमन करण्याच्या पद्धती वापरल्या गेल्या. मनाचे दमन अर्थात मनावर दबाव टाकणे किंवा जबरदस्ती करणे. हे अशक्य आहे कारण मनाचे दमन केले तर ते स्प्रिंगसारखे परत उफाळून येते. मनाला अमन करणे म्हणजे मनात कोणतेही विचार येऊ नयेत, यासाठी प्रयत्न करणे. परंतु हेही असंभव आहे कारण मन मुळातच आत्म्याची विचार करण्याची शक्ती आहे. विचार करणे हे आत्म्याच्या चैतन्यतेचे लक्षण आहे. त्यामुळे मनातील संकल्प थांबवणे म्हणजे जणू मृत अवस्थेला प्राप्त करणे होय. अशा परिस्थितीत आत्मारूपी आईच्या हातांनी मनाला सुमन बनविणेच हितकर होय. मनाला सद्‌विचार देऊन, सकारात्मक दिशा देणे आणि श्रेष्ठ चिंतनाची सवय लावणे म्हणजेच मनाला सुमन बनविणे होय. फुलाला सुमन असेही म्हटले जाते. त्यामुळे मनातील वाईट विचार हे काट्याप्रमाणे असतात. याउलट सद्‌विचार हे मनरूपी फुलातून सुखाचा सुगंध दरवळतात. म्हणून मनाला शुभचिंतनाची सवय लावणे गरजेचे आहे. **तात्पर्य म्हणजे मनरूपी बाळाला ज्ञानरत्नांशी खेळण्याची सवय लावली तर बाळाचे संगोपन चांगले होईल. त्याचबरोबर आत्मारूपी आईने देखील त्याच्याकडे नीट लक्ष दिले पाहिजे. मनाने जर कधी चूक केली तर वेळीच त्याला समजावून सांगितले पाहिजे.** या अनुषंगाने शाळेतील एक गोष्ट आपल्या सर्वांच्या माहितीची आहे. परंतु ती फार अर्थपूर्ण असल्याने पुन्हा नमूद कराविशी वाटते. एक लहान मुलगा पहिल्या दिवशी शाळेत गेला व दुसऱ्याची पेन्सिल चोरून घरी आला. आईने रागविण्या-ऐवजी त्याला शाबासकी दिली. दुसऱ्या दिवशी पुस्तक, तिसऱ्या दिवशी वॉटर बॅग आणत गेला आणि आई शाबासकी देत गेली. पुढे जाऊन तो दरोडेखोर झाला. म्हणतात ना '९९ दिवस चोराचे आणि १ दिवस कोतवालाचा' या उक्तीनुसार एक दिवस तो पोलिसांना सापडला. त्याला फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. फाशी देण्यापूर्वी त्याला शेवटची इच्छा विचारण्यात आली. तेव्हा आपल्या आईला भेटण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. आईला भेटल्यावर त्याने तिच्या कानाचा कडकडून चावा घेतला व म्हणाला की तू जर पहिल्या दिवशी मी चोरी केल्यावर माझा कान पकडला असता तर माझ्यावर ही वेळ आली नसती. तूच माझ्या या दुर्गतीसाठी जबाबदार आहेस. त्यामुळे मनाला सुमन बनविण्यात आत्मारूपी आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

देवर्षी नारदाने दिलेल्या रामनामाच्या मंत्राने वाल्याचा वाल्मिकी ऋषी झाला, हे सर्वांनाच ठाऊक आहे. खर तर चोर आणि प्रामाणिक, देव आणि दानव या चरित्ररूपी नाण्याच्या दोन बाजू आहेत. चोराचे वागणे कोणाला तरी पटते का? याउलट प्रामाणिक मनुष्य सर्वांनाच आवडतो. चांगल्या वर्तनाची चव सर्वच चाखू इच्छितात. मात्र दुसऱ्यांना दुःख देणारा हा सर्वांना अप्रिय वाटतो. राज्यतंत्र असो वा लोकतंत्र (राजेशाही वा लोकशाही) सर्वांचे भले करणाराच राजा वा पंतप्रधान बनून राज्य करतो. म्हणूनच शिवबाबा देखील मनाला जिंकण्याचा धडा देत आहेत कारण हाच सदाकाळ सुफल वा श्रेष्ठ फळ देणारा पुरुषार्थ आहे. ज्याप्रमाणे अभ्यासात रोज-रोज पाठांतर करून अभ्यास पक्का होतो. परीक्षेच्या वेळी तोच कामी येतो त्याचप्रमाणे बहुकाळाचे मनाला दिलेले सकारात्मक वळण सतोप्रधान संस्कारांची निर्मिती करीत असते. जो स्वतःच्या मनावर प्रेमाने राज्य करतो तो आपल्या श्रेष्ठ उज्ज्वल चरित्ररूपी शिल्पास आकार देत असतो अर्थात जगावर राज्य करण्याची क्षमता व पात्रता मिळवत असतो.

पिताश्री ब्रह्माबाबांचा हिमालयासम पुरुषार्थ हा 'मनजीते

जगतजीत' बनण्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. पिताश्रींनी मनरूपी मंत्र्यासोबत झोपण्यापूर्वी रोज वार्तालाप करून त्यावर स्नेहाने ताबा मिळवला. खऱ्या अर्थाने मन्मनाभवचा महामंत्र जीवनात अंगिकारला. सदैव ज्ञान-रत्नांशी खेळण्याची मनाला गोडी लावली. आपल्या मनाला शिवबाबांच्या श्रीमतरूपी प्रेमळ वात्सल्याची पालना दिली. रोज सकाळ-संध्याकाळ मनरूपी बाळाला ज्ञानरूपी जलाने स्वच्छ केले. अशा या निर्मळ मनात सर्वांसाठी सदा शुभभावना व शुभकामना ठेवल्या. मनात यत्किंचितही राग-द्वेषाचा कचरा साठू दिला नाही. **मनमंदिर सदा परमात्मचिंतनाने प्रकाशित केले व सर्व आत्म्यांवर आत्मिक प्रेमाचा वर्षाव केला. स्वपुरुषार्थाने स्वतःच्या मनावर राज्य करून सर्वांच्या हृदयावर राज्य करण्याची कला आत्मसात केली. त्यांच्या-सारखे आपणही मनाला जिंकून सारे जग जिंकू या.**

## व्यसनमुक्ती

(३१मे - तंबाखू मुक्ती दिनानिमित्त)

**व्यसनाच्या या तुरुंगात, कैद तुला झाली।**
**दिशाहीन मानवा आता, कोण तुझा वाली ?।। धृ ।।**
**दारु पिऊन कधी दुःख झाले का रे दूर।**
**तुझ्या जीवनी दारुमुळे, अशांतीचा पूर।**
**आरोग्याची तुझ्या झाली, पुरी राखरांगोळी।**
**दारुपायी संसाराची, माती तुझ्या झाली।। १ ।।**
**सिगारेटच्या धुराने, तणाव झाला का रे दूर।**
**तुझ्या जीवनी चिंतेचा, वाढत जाई सूर।**
**श्वासनलिकेची पाहा, धुरांडी बघ झाली।**
**कॅन्सरच्या रोगाची भीती, वाढतच गेली।। २ ।।**
**मादक द्रव्यांनी बेचैनी, झाली का रे दूर।**
**या नशेची धुंदी करी, सत्यापासून दूर।**
**कुकर्म करून चारित्र्याची, हानी बघ झाली।**
**अमूल्य अशा जीवनाची, दुर्दशा तूच केली।। ३ ।।**
**दृढनिश्चय करूनी तू, होशी मनावरती स्वार।**
**मग तुझ्या जीवनी नसे, आनंदाला पारावार।**
**सावर तू स्वतःला, शिवबाबा तुझा वाली।**
**तुला हिंमत देण्यासाठी, ब्रह्माकुमारी आली।। ४ ।।**

-- *ब्र. कु. माधुरी धात्रक, वाशी (मुंबई).*

▶ पान क्र. १२ वरून

तेव्हा त्याची गरज पडली. त्यामुळे जेव्हा मी ते घेण्यासाठी गेलो तेव्हा तेथील शिक्षकांना आश्चर्य वाटले. त्यांनी मला विचारले की तुम्ही इतकी वर्षे का म्हणून आला नाहीत ? तेव्हा मी त्यांना सांगितले की जर हे सर्टिफिकेट माझ्या-कडे असते तर कदाचित नोकरी करण्याचा विचार माझ्या मनात आला असता. परंतु मला तर विश्वसेवेचे महान कार्य करायचे होते. हाच एक ध्यास (लगन) मनात असल्याने मी दुसऱ्या गोष्टींचा कधी विचारही केला नाही. माझे हे उत्तर ऐकून शिक्षक थक्क झाले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की विश्वसेवेचे कार्य किती श्रेष्ठ आहे. तेथील शिक्षकांनाही मी ईश्वरी ज्ञान समजावून सांगितले.

खरोखर भोलानाथ शिवबाबांनी माझ्या जीवनात, मागील ३० वर्षात अनेक विशेषता, गुण भरून विश्वसेवा करण्यासाठी मला निमित्त बनवले. **भारतातील विविध भाषिक मासिकातून लेखन करण्याची सेवा, वृत्तपत्राद्वारे सेवा, टी.व्ही.इंटरनेट द्वारे सेवा, भारतातील ५ हजाराहून अधिक शाळा, कॉलेजातून सेवा, सुमारे १ हजार जेलमधील कैदी बांधवांची सेवा अशा अनेक प्रकारची सेवा करण्याची हिरेतुल्य संधी करावनहार शिवबाबांनी मला दिली, हेच माझे परम सौभाग्य !** आपल्या लाडक्या मुलांना सेवेसाठी निमित्त बनवून शिवबाबा आपल्या मुलांचे नाव रोशन करतो. माझ्या बाबतीत तर त्याने आपले स्वतःचे नावसुद्धा मला जन्मताच देऊन टाकले. त्याचा विसर मला कधीही पडू नये हीच त्याची त्यामागील योजना असावी. त्यामुळे मनी सदैव हाच भाव भरलेला असतो 'तूच कर्ता आणि करविता, समर्पण तुला रे भगवंता'.

वास्तविक आपण जे ईश्वराला समर्पण करतो, ते सुद्धा त्यानेच दिलेले आहे; हे कधीही विसरता कामा नये. या अनुषंगाने संत कबीराचे सुंदर वचन शेवटी नमूद करून लेखणीला विराम देतो,

**मेरा मुझमें कुछ नाही, जो कुछ है सो तोर।**
**तेरा तुझको सोपत, क्या लागत है मोर।।**

❖❖❖

# समयानुसार आता बेहदचे वैराग्य यायला हवे

(खास ब्रह्मावत्सांसाठी - भाग २)

*-- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे.*

मृत्युचे हे महाभयानक तांडव पाहून हे साधका, या मृत्युलोकाविषयी अद्यापही बेहदचे वैराग्य कसे येत नाही? येथे पैसा हेच सर्वस्व मानणाऱ्या लोकांचा स्वार्थ शिगेला पोहोचला आहे. व्यापारी अन्नधान्यात भेसळ करीत आहेत. माणसे अशुद्ध झाली की, त्यांना विकत मिळणारे पदार्थही शुद्धस्वरूपात मिळत नाहीत.

सध्या छोट्या बालकांचा मुख्य आहार असलेले दूधही भेसळयुक्त मिळत आहे. स्वार्थाची परिसीमा तर हीच आहे की, केवळ दिखाऊ लोककल्याण करून काही राज्यकर्ते आपला बँक बॅलन्स व काळा पैसा वाढविण्याच्या प्रयत्नात कोट्यावधी रुपयांची अफरातफर करीत आहेत. येथे सर्वात अभाव आहे तो आत्मिक प्रेमाचा व खऱ्या माणूसकीचा! एकतेमध्येच वास्तविक शांती असते. परंतु येथे अनेक धर्म, उपधर्म निर्माण झाल्याने पूर्णतः अशांती माजली आहे. 'सर्वधर्म समभाव' व 'सबका मालिक एक' या संकल्पना केवळ कागदावरच राहिल्या आहेत. धर्मा-धर्मात द्वेष वाढल्याने व कोणत्यातरी धर्मांध व्यक्तीने अघोरी कृत्य केल्यास जातीय दंगलीची आग कधी केव्हा कशी पसरेल हे सांगता येणार नाही. ही कलियुगी अशाश्वत भितीदायक व धर्मभ्रष्ट परिस्थिती पाहून अद्यापही आपणास बेहदचे वैराग्य का येत नाही? जातीय दंगली होऊ नयेत तसेच परस्परातील द्वेष, अनादर व आपपरभाव समाप्त होऊन प्रेम, आदर व आपलेपणाची भावना निर्माण व्हावी म्हणून प्लॅटिनिअम ज्युबलीच्या निमित्ताने ब्रह्माकुमारी विद्यालयाने One God One Family ही बेहदची संकल्पना घेऊन मुख्य-मुख्य शहरात महोत्सव साजरे केले आहेत. येथील सर्व राजयोगी परमात्म्याला समर्पण तर होतातच त्याचबरोबर ते देहाचे दोन प्रकारचे धर्मही परमात्म्याला समर्पित करतात. त्यापैकी पहिला धर्म, ज्या धर्मात आत्मा देह धारण करून जन्माला आला तो धर्म. दुसरा धर्म, कामक्रोधादी पाच विकार हे देहाचे धर्म. असे देहाचे दोन्हीही धर्म समर्पित करून स्वधर्माचा ते मनापासून स्वीकार करतात. इतकेच नव्हे तर ते त्या धर्मात स्थितही होतात. आत्म्याचा धर्मच आहे पवित्रता, सुख, शांती, प्रेम, आनंद, ज्ञान व शक्ती. जे राजयोगी आत्म्याच्या मूळ धर्मात स्थित झाले आहेत त्यांच्या कल्याण-कारी आणि शुद्ध संकल्पातून एका अलौकिक गीताची निर्मिती झाली आहे. या लहान गीताद्वारे एक महान विचारप्रणाली जगातील सर्व धर्मांच्या सर्व आत्म्यांपुढे ठेवली आहे. विश्वएकता निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या अलौकिक गीतातील काही मोजक्या ओळी पुढीलप्रमाणे आहेत,

**सबका मालिक एक फिर क्यूँ बटा हुआ संसार है,**
**सच पुछो सारी दुनिया अपनाही परिवार है,**
**अलग अलग है रंग फूलके माटी सबकी एक है,**
**माला (भिन्न भिन्न धर्मांच्या माळा) कोई बनाए**
**लेकिन माली सबका एक है।**

अशाप्रकारे हे संपूर्ण विश्व त्या परमपिता परमात्म्याचा परिवार असून, आपण सर्वजण एकमेकांचे भाऊ आहोत. या अलौकिक विचारांचा स्वीकार करून भिन्न-भिन्न धर्माचे लोक एकतेने राहू लागले तर तो एक चैतन्य फुलांचा सुंदर गुच्छ तयार होईल. परंतु या चैतन्य फुलांचे एकमत न झाल्याने ही फुले विस्कळीत झाली आहेत. हा विस्कळीतपणा अर्थात धर्माधर्मातील मतभिन्नता पाहून तुम्हास अद्यापही बेहदचे वैराग्य येत नाही काय?

मृत्यु व शारीरिक रोगापासून आपले संरक्षण व्हावे म्हणून मानवाची सतत धडपड चालू आहे. आजच्या मानवाची बुद्धी केवळ देहकेंद्रित असल्याने त्याचे स्वतःकडे अर्थात आत्म्याकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. शरीर तंदुरुस्त रहावे म्हणून सार्वजनिक ठिकाणी योगासने व प्राणायाम करणाऱ्यांची संख्या भरपूर आहे तसेच एखाद्या प्रसिद्ध डॉक्टरकडे चार-चार तास थांबून उपचार घेणाऱ्यांची संख्या

काही कमी नाही. परंतु जेथे प्रथमतः आत्म्याचे रोग ठीक करून अनेक जन्मांसाठी आत्मिक व शारीरिक निरोगी जीवन प्राप्त होते, तेथे मात्र गर्दी फारच कमी असते अर्थात ब्रह्माकुमारी रुहानी हॉस्पिटलमध्ये स्वतः सर्जनांचाही सुप्रीम सर्जन परमात्मा आत्म्यावर उपचार करीत असताना आत्मकेंद्रित बुद्धीचे व आत्मोन्नती साधणारे मनुष्यआत्मे अल्प संख्येत आपली हजेरी लावीत आहेत. शरीराचे रोग अर्थात आत्म्याच्या साधनाचे रोग ठीक करण्यासाठी मनुष्याजवळ भरपूर वेळ आहे परंतु स्वतःचे म्हणजे आत्म्याचे रोग ठीक करण्यासाठी मात्र त्याला दिवसातील एक तासही वेळ नाही. ही मनुष्याची केवळ देहकेंद्रित वृत्ती पाहून तुम्हास बेहदचे वैराग्य येत नाही काय?

आजच्या मानवाला अनेक रोग होण्याचे एक कारण हे देखील आहे की तो व्यसनाधीन झालेला आहे. ही व्यसनाधीनता व भ्रष्ट आचरणामुळे भारतात एकेकाळी असलेल्या श्रेष्ठ दैवी संस्कृतीची जागा भ्रष्ट अशा असुरी संस्कृतीने घेतली आहे. परिणामी असुरी कर्मांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. फलस्वरूप सरकारमान्य व जनमान्य अशी दारूची दुकाने थाटली गेली आहेत. व्यसनी पेय व व्यसनी पदार्थ विकणाऱ्या दुकानदारांना आपण काही पापकर्म करीत आहोत या जाणीवेचा लवलेशही नसतो. बहुतांश समाज या व्यसनांच्या आहारी गेला आहे. 'मोठ्या लोकांमध्ये गेल्यावर थोडी घ्यावी लागते' असे सोयीस्कर विचार करणारे लोक काही कमी नाहीत. पूर्वी सुसंस्कारीत कुटुंबातील तरुण मुले अभिमानाने सांगावयाचे की, मला सुपारीच्या खांडाचेही व्यसन नाही. आज त्याच समाजातील काही लोक व्यसनाविषयी आपले अज्ञानयुक्त मत व्यक्त करतात की, माणसाला काहीतरी व्यसन हे असलेच पाहिजे त्याशिवाय जीवनाला अर्थ नाही. ब्राऊन शुगर सारख्या व्यसनांनी तर केवळ तरुणांचेच नव्हे तर तरुणींचेही जीवन उध्वस्त केले आहे.

अशी दयनीय व विदारक अवस्था आजच्या समाजाची झाली आहे. ही अवस्था पाहून हे साधका तुला अद्यापही या कलियुगाचे वैराग्य का येत नाही? साधकांनी हा ज्ञानबिंदू बुद्धीत ठेवणे आवश्यक आहे की, या तमोप्रधान व निरस कलियुगाचे वैराग्य आले तरच सतोप्रधान सत्ययुगाचे दैवी स्वराज्य उपभोगण्याचे भाग्य निर्माण होऊ शकते. **या लेखाचा उद्देश केवळ तरुणांना निर्व्यसनी बनविणे व या सत्संगातील वैराग्य न येणाऱ्या साधकांना वैराग्य आणणे हा नसून, तरुण पिढीला हा ईश्वरीय संदेश देणे आहे की, 'युवा तू बन सर्व महान, तू है सारे जग की शान, शिवपिताकी आस तुम्हीपे तू कर विश्वका कल्याण' असे स्वकल्याण व विश्वकल्याण साधावयाचे असेल तर प्रथमतः संपूर्ण निर्व्यसनी बना.**

आपली भारतीय संस्कृती एकेकाळी संपूर्ण निर्विकारी, निर्व्यसनी आणि चारित्र्य संपन्नतेच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान होती. अर्थात त्या श्रेष्ठ सस्कृतीला दैवी संस्कृती असे नाव होते. चार युगांच्या व काळाच्या ओघात संस्कृतीची जागा विकृतीने घेतली आहे. मनुष्य आत्म्यात निर्माण झालेल्या असुरी गुणांमुळे मूळ संस्कृती रसातळाला जाऊन असुरी संस्कृती निर्माण झाली आहे. समाजात जी संस्कृती निर्माण होते तीच संस्कृती चित्रपट व टी.व्ही. मालिकांद्वारे दाखविली जाते. अर्थात बोटावर मोजण्याइतपत काही चित्रपट व टी.व्ही. मालिका त्यास अपवाद आहेत. बहुतांश कौटुंबिक मालिकेतून सुडाची भावना, छळवाद, भ्रष्टाचार, व्यभिचार तसेच चारित्र्य संपन्नतेचा अभाव दर्शविला जातो. परमात्म्याने सिनेमास 'सीन की मॉ' म्हटले आहे. त्यात दर्शविले जाणारे नाच पाहिले की असे वाटते हे केवळ माकड चाळेच आहेत. आदि मानव माकड होता असे मानले जाते. परंतु वर्तमान समयीचा मानव आपल्या अशा कर्माने माकड झाला आहे असे म्हणावे लागेल. अशा बिभत्स नाचाला नृत्य म्हणता येणार नाही. नृत्य त्यालाच म्हणावयाचे जे मूळ भारतीय संस्कृतीनुसार शास्त्रशुद्ध आहे. असे नृत्य करण्यास कुणाचाही हरकत नसावी. ही कला आत्मसात करणाऱ्यांनी नृत्यसम्राट पंडित गोपीकृष्णसारखे अथवा पंडित बिरजू महाराजांसारखे नृत्य अवश्य शिकून आपली कला समाजापुढे सादर करावी. हे साधका, या अधःपतित युगातील विकृत गीते, विकृत चित्रपट, विकृत टी.व्ही. मालिका आणि विकृत नाच पाहूनही अद्याप तुला बेहदचे वैराग्य कसे येत नाही?

चारित्र्यसंपन्न समाज हा सुखशांतीने संपन्न असतो, तर चारित्र्याचा अभाव असणारा समाज हा दुःख अशांती रोग व शोकाने पिडीत असतो. वर्तमान समयीचा समाज अगदी असाच आहे. सुखशांती प्राप्त करण्यासाठी मनुष्य नानाविध कर्मकांडांचा आधार घेऊन देवांच्या जडमूर्तीची उपासना करीत आहे. भक्तिचा पसारा वाढत चालला आहे परंतु सुखशांती मात्र संकुचित होत चालली आहे. ही सुख शांती समाजाला प्राप्त करवून देण्याच्या दृष्टीने विज्ञानाचा तितकासा उपयोग नाही.

वर्तमानसमयी देवतांच्या नावे मुक्या प्राण्यांचा बळी देणे, विवेकहीन आनंद, अंधश्रद्धायुक्त भक्ती, सिद्धांतहीन राजनिती व भेसळयुक्त व्यापार इत्यादी धर्मग्लानीची सर्व लक्षणे आपल्या भ्रष्ट व अधर्मयुक्त कर्मांद्वारे मनुष्याने कधीच दृष्टीपथात आणली आहेत. **या सर्व अकल्याण-कारी कुलक्षणामध्ये एक कल्याणकारी सुलक्षण केवळ ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्राला दिसणारे आहे. ते सुलक्षण आहे कल्याणकारी परमात्म्याचे या भूतलावर अवतरण होणे. परमात्म्याचा अवतरित होण्याचा उद्देशच आहे धर्मग्लानीचा घोर अंधःकार नष्ट करून एका सत्यधर्माची व धर्मयुक्त सत्ययुगाची स्थापना करणे.** हा महाअवतरणाचा व परमात्म कार्याचा महासंदेश देऊनही बहुतांश मनुष्य-आत्म्यांच्या बुद्धीचा हा निर्णय होत नाही की, केवळ परमात्म्याच्या या सत्संगात अर्थात ब्रह्माकुमारी विद्या-लयातच मनुष्यमात्राचे सर्वाधिक कल्याण होणार आहे. उलट मनुष्यानिर्मित सत्संगाबरोबर तसेच संतमहात्म्यांच्या सत्संगाबरोबर या सत्संगाची तुलना करून ते आपले मनमत व्यक्त करतात की, 'अहो, सर्व मार्ग सारखेच आहेत. कोणत्याही मार्गाने तुम्ही परमात्म्याला प्राप्त करू शकता.' त्यांचा हा महागैरसमज दूर व्हावा म्हणून ज्ञानमुरलीत परमात्म्याचे महावाक्य आहे की 'मैं भक्ति से किसीको भी मिलता नही हूँ। भक्तोंको मैं केवल उनके इष्ट देवताओंका साक्षात्कार कराता हूँ।' या महा-वाक्यावरून ही समज मिळते की, साक्षात्कार हा निराकार परमात्म्याचा होत नसून त्याच्या रचनेचा म्हणजे देवी-देवतांचा होत असतो. त्या साक्षात्काराने ना त्या भक्ताचे प्रारब्ध बनते, ना परमात्म्याचा, ना त्याच्या रचनेचा वास्तविक परिचय प्राप्त होतो. **त्यासाठी परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'रचयिता और उसके रचनाके आदि, मध्य, अंतको कोई नही जानता। क्यूँकी यह ज्ञान ना किसी मनुष्यमें है ना किसी शास्त्रमें।' या महावाक्याचा अनुभव प्रत्येक सेवाधारी ब्रह्मावत्साला समाजात सेवा करताना येत आहे.** या समाजात असे कित्येक मनुष्यआत्मे आहेत की त्यांना भिन्न-भिन्न प्रकारे परमात्म ज्ञान समजावूनही त्यांच्या बुद्धीला लागलेले अज्ञानाचे भले मोठे कुलूप उघडले जात नाही. अशा अज्ञान अंधःकारात निद्रिस्त झालेल्या आत्म्यांना परमात्म्याने कुंभकर्ण म्हटले आहे. हे साधकांनो, असा कुंभकर्णीय समाज पाहून अद्यापही तुम्हास बेहदचे वैराग्य कसे येत नाही? (कुंभ अर्थात ज्ञानाचा कुंभ, कर्ण अर्थात कान. ज्याच्या कर्णात ज्ञानाचा कुंभ शिरत नाही तो कुंभकर्ण होय) निरंतर व बेहदचे वैराग्य केवळ महारथी आत्म्यांनाच प्राप्त झाले आहे व ज्यांना असे बेहदचे वैराग्य प्राप्त होते त्यांना केवळ परमधाममधील परमात्म्याचेच आकर्षण असते. फलस्वरूप तेच परमात्म्याशी निरंतर योगयुक्त होऊन खऱ्या अर्थाने राजऋषी होऊ शकतात. म्हणून साधकांनी बेहदच्या वैराग्याचे केवळ एक पाऊल पुढे टाकावे, भाग्यविधाता परमात्मा त्यांच्यावर पद्मापद्म भाग्याचा वर्षाव करील. अर्थात पुढील वीस जन्म केवळ दैवी संस्कृतीचे प्रारब्ध उपभोगावयाचे आहे तेथे (सत्ययुग त्रेतायुगात) कोणताही संन्यास करावयाचा नाही. देवात्मेही कधीकाळी संन्यास अवश्य घेतात. परंतु दैवी युगात व दैवी रूपात नव्हे तर संगमयुगावरील अलौकिक ब्राह्मण रूपात. या ब्राह्मण रूपातच ते कलियुगी नरकाचा बेहदचा संन्यास करतात. बेहदचे वैराग्य व बेहदचा संन्यास याचे उत्तम उदाहरण बाळकृष्णाच्या चित्ररूपात आहे. या चित्रात त्याने कलियुगी विश्वाला चरणकमलाने दूर ढकलून सत्ययुगी स्वर्गीय विश्वाचा गोळा आपल्या करकमलात स्विकारलेला आहे. **माझ्या आत्मिक बंधूनो, हा कलियुगाच्या अंताचाही अंत असल्याने पाच विकारांच्या सूक्ष्म अग्नीत**

▶ पान क्र. ३२ वर

# कर्मसिद्धांत व मृत्यु

*-- ब्र.कु.बालूभाई, शांतीवन (आबू रोड).*

संसार एक कर्मक्षेत्र आहे आणि शरीर हे कर्माचे साधन आहे. शरीरातील विभिन्न इंद्रिये, मनाच्या आदेशानुसार आपापल्या क्रिया करतात. या क्रिया जर सुखदायी असतील तर व्यक्तीच्या कर्माच्या खात्यात पुण्य जमा होते आणि जर त्या दुःखदायी असतील तर व्यक्तीच्या खात्यात पाप जमा होते. अशारीतीने प्रत्येक कर्माचे फळ निश्चित आहे. परंतु सर्वच कर्मांची फळे ही लगेचच मिळू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचा संचय होत जातो. परिणामी कर्मांची फळे त्याच जन्मात प्राप्त न होता, भविष्यातील कुठल्यातरी जन्मात मिळू शकतात. मनुष्याला मात्र हे समजून घेता येत नाही की मी कोणत्या कर्माचे फळ भोगत आहे. **एवढं मात्र निश्चित की आज जे आपल्या समोर आहे ते आपल्या कुठल्यातरी कर्माचे फळ आहे. तात्पर्य म्हणजे जे पेराल, जितके पेराल तितके समयानुसार अवश्य उगवेल, हा कर्मसिद्धांत अटल आहे.**

तथापि ज्या लोकांच्या जीवनात अतिशय दुःख आहे, त्यांच्या तोंडून हे उद्गार ऐकायला मिळतात की हा संसार कुणी बनवला? जीवनाचा शेवट जर मृत्युच आहे तर जगण्यात काय अर्थ आहे? वास्तविक हा संसार कुणीही बनवलेला असो परंतु हे मात्र सत्य आहे की प्रत्येक व्यक्ती आपल्या कर्माच्या आधारे एक छोटासा संसार बनवित असतो. आत्मा कर्माच्या आधारेच आपले मित्र, आप्तेष्ट, शत्रू इत्यादी स्वरूपात संसार बनवतो. तसेच आपल्या कर्माचा हिशोब पूर्ण करण्यासाठी जन्म-मृत्युच्या या चक्रव्युहात तो अडकलेला असतो. या अनुषंगाने समर्थ रामदासांचा एक श्लोक आहे -

**जिवा कर्मयोगे जगी जन्म झाला।**
**परी शेवटी काळमुखी निमाला।**
**महाथोर ते मृत्युपंथेची गेले।**
**किती एक ते जन्मले आणि मेले।।**

बहुतेक सर्व धर्मामध्ये कर्म सिद्धांताला मान्यता आहे. जेथे कर्म सिद्धांत आहे तेथे पुनर्जन्माचा सिद्धांतही अटळ आहे. त्यामुळे हा संसार कुणी बनवला? मृत्य जर अटळ आहे तर एवढी धडपड कशासाठी? हे प्रश्न न विचारता, असे प्रश्न विचारायला हवेत की भूतकाळात केलेल्या कर्मामुळे आज होणाऱ्या दुःखातून माझी सुटका कशी होईल? वर्तमान काळात कोणते कर्म केले म्हणजे मृत्युची भीती वाटणार नाही? वास्तविक मृत्यु हा जीवनाचा आनंदी क्षण आहे. परंतु मनुष्य हे विसरून जातो की मरणात दुःख नाही. दुःख हे कलियुगी दुःखधाममध्ये जगण्यात आहे. मनुष्याने केलेल्या पापकर्माची फळे जेव्हा त्याला भोगावी लागतात तेव्हा त्याला दुःख होते. **म्हणून प्रत्येकाने वर्तमानसमयी आपल्या हातून कुठलेही पापकर्म (काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार ईर्ष्या, द्वेष, घृणा, असत्यता इत्यादी गोष्टींवर आधारीत कर्म) होऊ नये, यासाठी कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे, कारण पापकर्माची सजा प्रत्येक आत्म्याला केव्हातरी भोगावीच लागते. याला कोणीही अपवाद नाही.** यासंदर्भात रामायणातील कथा आपण सर्वजण जाणतो. राजा दशरथाच्या हातून अगदी नकळत श्रावण बाळाचा वध झाला. तरीसुद्धा त्याची शिक्षा राजा दशरथाला भोगावीच लागली. जसा श्रावण बाळाच्या आई-वडिलांनी पुत्रवियोगाच्या दुःखाने प्राण त्याग केला तसाच राजा दशरथानेही पुत्रवियोगाने प्राण त्यागला.

### ❐ कर्मसिद्धांत आणि 'अंत मती सो गती'

मी एकदा हॉस्पिटलमध्ये एका पेशंटला भेटायला गेलो होतो. त्यावेळी मला 'अंत मती सो गती' चे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले. एका बेडवर एक युवक मृत्युचे अंतिम क्षण मोजत होता. अगदी मोठ्याने ओरडत होता की मला दारु पाहिजे. त्याला लहान वयातच दारु प्यायची सवय लागली होती. त्यामुळे त्याचे अल्सरचे ऑपरेशन देखील

असफल झाले होते. अशा परिस्थितीत जिवंत राहणे कठीण होते. शेवटी त्याच्या नातेवाईकांनी त्याला दारु पाजली. तेव्हा त्याने शरीर सोडले. दुसऱ्या एका बेडवर एक ८० वर्षांची म्हातारी आजी हातात माळ घेऊन 'श्रीकृष्णाय नमः' असे म्हणत होती. बघता-बघता थोड्या-वेळाने तीनेही श्रीकृष्णाचा फोटो आपल्याजवळ घेऊन मग शरीर सोडले. ही दोन्ही दृश्ये शरीर सोडण्याची होती. परंतु यावरून आपले लक्षात आले असेल की **जीवनात वारंवार केलेल्या कर्माच्या आधारे कसे संस्कार बनतात व तेच संस्कार अंतिम समयी आपल्या समोर कसे येऊन उभे राहतात. म्हणूनच अंतिम समयी परमात्मा शिव पित्याची आठवण राहावी, यासाठी बऱ्याच काळचा अभ्यास आवश्यक आहे या आठवणीमुळेच आपण श्रीलक्ष्मी श्रीनारायणाच्या कुळात अनेक जन्म घेऊ शकतो.**

**❒ कर्मसिद्धांत आणि मृत्युची कल्याणकारिता**

वास्तविक जन्म आणि मृत्यु हे दोन्ही शब्द विरोधी नाहीत. परंतु एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. क्षणभर कल्पना करा की जर मनुष्याला मृत्युच आला नसता तर? तो दुःखी होऊन एकतर वेडा झाला असता किंवा त्याने आत्महत्या तरी केली असती कारण वाढत्या वयानुसार प्रकृतीही खालावत जाते. जशी एखाद्या औषधाची अंतिम तारीख (expiry date) असते, तशीच शरीर प्रकृतीचीही असते. त्यामुळे प्रत्येकासाठी येणारा नैसर्गिक मृत्यु हा कल्याणकारी आहे. **मृत्यु म्हणजे जीर्ण झालेले शरीररूपी वस्त्र बदलून त्याऐवजी नवीन शरीररूपी वस्त्र परिधान करणे. वास्तविक नवीन वस्त्र परिधान करताना प्रत्येकाला आनंदच होतो. मग मृत्युचे दुःख का व्हावे? याला मुख्य कारण म्हणजे मृत्युविषयी माणसाच्या मनात फार मोठे भय असते. ते दूर करण्या-साठी आवश्यक आहे आध्यात्मिक ज्ञान.** त्याचा अभाव असल्याने मृत्युचे भय संपत नाही. ते संपण्यासाठी पुढील ज्ञानबिंदू सदैव लक्षात ठेवा -

**१) मृत्यु म्हणजे परमात्मा पित्याच्या घरचे निमंत्रण समजा** - आपण सर्वजण पिता परमात्म्याच्या घरून अर्थात परमधामहून या सृष्टीवर येतो. त्यामुळे जेथून आलो तेथे पुन्हा अवश्य परत जावे लागणार आहे. परमात्मा शिव पिता तर प्रेमाचा सागर आहे. त्याच्याजवळ परमधाम मध्ये जाणे म्हणजे त्याच्या प्रेमात लवलीन स्थितीचा परमसुखद अनुभव करणे होय. म्हणून मृत्युला आनंदपूर्ण सोहळा समजा.

**२) आपले शरीर, धर्माच्या साधनेसाठी आहे** - जसे कोणी एखादी गाडी खरेदी करतो व त्यापासून कमाई करतो. त्याप्रमाणे शरीररूपी गाडीदेखील पुण्याची कमाई करण्याचे साधन समजा. बरीच कमाई केल्यानंतर गाडी जर खराब झाली तर व्यक्ती केलेली कमाई पाहून खुश होतो. गाडी बेकार झालेली पाहून तो दुःखी होत नाही. उलट तो आपण केलेल्या कमाईतून नवीन गाडी खरेदी करून आपला व्यवसाय अधिक उत्साहाने पुढेही करत राहतो. तसेच शरीररूपी गाडीचा सदुपयोग करून इतके पुण्य जमा करा की तुम्हाला सत्ययुगात नवीन सतोप्रधान शरीररूपी गाडी प्राप्त होईल.

**३) शरीरापासून अलिप्त राहण्याचा अभ्यास करा** - जो शरीरापासून अलिप्त, अशरीरी आत्मा समजण्याचा अभ्यास करतो, तो मृत्युला एक खेळ समजतो. तो आपल्या जीवनातील प्रत्येक घडी अंतिम घडी समजतो. परिणामतः त्याची आत्मिक स्थिती इतकी परिपक्व होते की त्याला सारा संसार असार वाटू लागतो तो आपला प्रत्येक श्वास व संकल्प श्रीमतानुसार सफल करत असतो. त्यामुळे त्याच्यासाठी मृत्यु म्हणजे देहरूपी पिंजऱ्यातून मुक्तीचा क्षण, हा अतिशय आनंदाचा असतो. 'अब घर जाना है' हीच धुन त्याला असते.

**४) शरीर हे कर्मजन्म आहे - शरीराचा जन्म हा कर्माच्या हिशोबानुसार होत असतो. जेव्हा आत्मा, शरीराला आधार बनवून आपल्या कर्माचा हिशोब पूर्ण करतो तेव्हा शरीराचा मृत्यु होतो. त्यामुळे कर्माच्या अधीन असलेल्या या शरीराशी मोह ठेवणे हे चुकीचे आहे. या मोहाने व्यक्ती आंधळा होतो व मृत्युचे दुःख करत बसतो.** वास्तविक आत्मा तर अमर आहे त्यामुळे प्रत्येकावर आत्मिक प्रेम करा म्हणजे मृत्यु हा दुःखदायी न बनता आनंददायी वाटेल.

या अनुषंगाने पिताश्री ब्रह्माबाबांच्या जीवनातील एक

प्रसंग नमूद करावासा वाटतो. पिताश्री ब्रह्माबाबांनी जेव्हा यज्ञाची स्थापना केली तेव्हा त्यांच्या परिवारातील सर्व सदस्य देखील समर्पित झाले. त्यात बाबांची लौकिक युगल (माता यशोदा) यांचासुद्धा समावेश होता. त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत यज्ञ-सेवा केली. त्यांनी जेव्हा शरीर सोडले तेव्हा त्या माऊंट आबूला नव्हत्या. हा समाचार जेव्हा ब्रह्मा बाबांना प्राप्त झाला तेव्हा बाबांनी आपली प्रतिक्रिया पुढील शब्दात व्यक्त केली, 'अम्मा मरे तो हलुआ खाओ, बीबी मरे तो हलुआ खाओ।' पिताश्री ब्रह्माबाबांच्या नष्टोमोहा स्मृतिस्वरूप स्थितीचे प्रत्यक्ष प्रमाण या महा-वाक्यावरून प्राप्त होते. त्यांनी परमात्मा शिव पित्यावर स्वतःला पूर्णपणे समर्पित केले होते. त्यांचे स्वतःच्या देहाचे ही आकर्षण समाप्त झाले होते. त्यामुळे दुसऱ्याच्या देहाची स्मृती वा आसक्तीचा प्रश्नच उरला नव्हता. त्यांचा संपूर्ण स्नेह अविनाशी आत्म्याशी होता. आत्मा तर कधी मरत नाही मग दुःख तरी कसले करायचे? शेवटी समर्थ रामदासांचा एक श्लोक नमूद करावासा वाटतो, जो अतिशय उद्‌बोधक व सारगर्भित आहे -

**मना मानसी दुःख आणू नको रे।**
**मना सर्वथा शोक चिंता नको रे।**
**विवेके देहेबुद्धी सोडून द्यावी।**
**विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी॥**

यावरून आपल्या लक्षात येईल की देहबुद्धी हीच शोक, चिंता व सर्व दुःखाचे कारण आहे. त्यामुळे तिचा त्याग करून सदैव विदेही आत्मिक स्थिती राहणे, हेच सर्व सुखाचे एकमेव सहज साधन आहे. मुख्य म्हणजे या स्थितीत राहिल्यानेच सर्व सुखाचा सागर शिवबाबांशी आपले सर्व संबंध जुळतात व आपल्याला त्यांच्याकडून मुक्ती व जीवनमुक्तीचा जन्मसिद्ध अधिकार प्राप्त होतो. याचेच गायन आहे, 'सर्व सुखल्यालो सर्व अलंकार, आनंदे निर्भर डुल्लतसो।' (वास्तविक हेच आपल्या नष्टोमोहा-स्मृतीस्वरूप स्थितीचे लक्षण आहे). **शेवटी आपल्याला खुशीने शरीर सोडता आले पाहिजे. बस, मी आत्मा, आपल्या घरी शिवबाबांबरोबर जात आहे, अशी स्थिती असेल तर आपण विजयमालेचे मणके बनू.** ❖❖❖

▶ पान क्र. १४ वरून

पाठीला बाक येत नव्हता. ताठ बसल्यामुळे पोटात नेमके तेवढेच अन्न जात होते. पोटाचा एक तृतीयांश भाग अन्नाने भरावा, बाकीचे दोन तृतीयांश पाण्याकरिता व हवेकरिता सोडावे असा नियम होता. आज असे घडत नसल्यामुळे स्वास्थ्य बिघडण्याचे प्रमाण खूपच वाढले आहे. चंद्र कलेकलेने वाढतो. आपले शरीर मात्र किलो-किलोने वाढत आहे. वरण भात, भाजी, पोळी, तूप, चटणी कोशिंबीर, पापड, लोणचे, लिंबाची फोड आणि दह्याची वाटी अशी महाराष्ट्रीयन थाळी सर्वात समतोल आणि सकस आहार आहे, असे सिद्ध झाले आहे.

**राजयोग सांगतो १) मांसाहार वर्ज्य आहे, २) सात्विक, साजुक, सकस अन्न शिवबाबांची याद करीत घ्यावे, ३) स्वतः बनवावे किंवा घरचेच खावे, ४) कांदा व लसूण तामसिक असल्याने वर्ज्य आहेत, ५) नेहमी दृष्टी देऊन अन्न खावे.** डॉ. डॅनियल गोलमन यांनी इमोशनल क्वोशियन्ट व विषारी भावना, टॉक्सिक इमोशन्स् याबाबत पुस्तक लिहिले व भावनांचे महत्त्व भारतीयांना ताबडतोब पटले. रोज शिव्यांचा भडिमार करीत पंचपक्वानांचे व्हिटामिन व अँन्टी ऑक्सीडन्टने भरपूर ताट जरी वाढले तरी अन्न ग्रहण करणारा कृश व अशक्त होत जातो आणि अकालीच संपू देखील शकतो. हे समस्त बायकांनी व फेल झालेल्या अभागी मुलांच्या आई-वडिलांनी अवश्य लक्षात ठेवावे.

आपले अन्न व शरीर ऐंशी टक्के पाण्याद्वारे साकारलेले आहे. **रशियन थॉट एक्सपरीमेन्टस् (संकल्पांवर वैज्ञानिक प्रयोग) यांनी स्पष्टपणे सिद्ध केले आहे की आपले विचार आणि भावना फारच प्रभावशाली असतात. अन्न स्वतःवर व वातावरणावर प्रभाव टाकते. डॉ. मसारु इमोटो यांनी एक आगळा-वेगळा प्रयोग केला.** त्यांनी एका पेल्यात पाणी घेऊन त्यावर विभिन्न भावनांचा क्रमशः भडिमार केला. एकेका भावनेचा पाच मिनिटे भडिमार केल्यानंतर वॉटर क्रिस्टलेग्राफी तंत्राद्वारे पाणी तपासले. काम, क्रोध, मद, लोभ, मत्सर उद्दिपित करणाऱ्या शब्दांचा भडिमार किंवा रागावणे, शिवीगाळ करणे, टाकून बोलणे, हतोत्साहित करणे इत्यादी विषारी भावनांचा भडिमार

घडल्यानंतर पाण्याच्या क्रिस्टल्स्नी भयावह, वादळी किंवा विकृत आकृत्या निर्माण केल्यात. पण प्रेमाचे, उत्साह वाढविणारे, प्रेरित करणारे, दिलासा देणारे, आनंद प्रकट करणारे इत्यादी सकारात्मक शब्द वापरल्या-नंतर पाण्याच्या क्रिस्टल्स्नी फार आकर्षक व सुरेख आकृत्या निर्माण केल्या आहेत. यावरून डॉ.मसारु सांगतात की, अन्य कोणाला दुःख देणारे शब्द त्या व्यक्तीच्या शरीराच्या पेशीत काय भयावह प्रकार निर्माण करीत आहेत हे नेहमीच लक्षात ठेवा. यावर काही घोर कलियुगी आत्मा नक्कीच म्हणेल, मला काम करून घ्यायचे आहे आणि दुसऱ्यांच्या शरीरात विपरीत परिणाम घडत असतील तर मी त्याची कशाला काळजी करू? यावर डॉ.मसारु सांगतात, तुम्हाला दुसऱ्यांची पर्वा कदाचित नसेल, पण निदान स्वतःची तरी पर्वा करणार आहात की नाही? कारण तुमचे स्वतःचे शरीर देखील ऐंशी टक्के पाणीच आहे.

**ब्रह्माभोजन, भोग किंवा शिवबाबांची याद करीत शिजवलेले अन्न फार शक्तिशाली असते हे ब्रह्माकुमार डॉ.चंद्रशेखर यांच्या एका आगळा-वेगळ्या प्रयोगाद्वारे सिद्ध होते.** काही साधकांचा योग चांगला असल्यास (ज्वालामुखी याद) आसमंतातून एक अमोघ शक्ती आपल्या शरीरात प्रवेश करून आपल्या प्रत्येक पेशीत संचारण करीत आहे, असे वाटते. 'बाबा मिलन'च्या वेळी दादींच्या शरीराद्वारे शिवबाबांकडून दृष्टी मिळाल्यावर देखील असाच अनुभव येतो. डॉ.चंद्रशेखरजींचा प्रयोग, सदर अनुभव एक निव्वळ भास नसून एक वैज्ञानिक वास्तविकता आहे, असे सिद्ध करतो. डॉ.चंद्रशेखरजी प्रेक्षकांमधून काही आजारी व्यक्तींना व्यासपीठावर बोलावितात. युनिव्हर्सल स्कॅनर नावाच्या यंत्राद्वारे या आजारी व्यक्तिची कोणती शक्तिचक्रे अवरोधित आहेत, हे ते दाखवून देतात. मग पाच मिनिट राजयोग मेडिटेशन म्हणजेच याद करून पिण्याच्या पाण्याला दृष्टी देतात. सदर निव्वळ दृष्टीद्वारे मंतरलेले पाणी, सदर आजारी व्यक्तींना प्यायला देतात. मग काय आश्चर्य? यंत्राद्वारे पुन्हा तपासणी केल्यावर शक्तिचक्राचे अवरोध नाहीसे झाल्याचे सर्व प्रेक्षकांना स्पष्टपणे दिसून येते. इतकेच काय, त्यांच्या शरीराभोवती असलेल्या शक्तीवलयाचा परीघ दोन-तीन फुटांपासून वाढून १० ते १५ फुट झाल्याचे दिसून येते. सबब योगयुक्त दृष्टी द्यावी व दृष्टी घ्यावी.

वैद्यकीय संशोधनाद्वारे सिद्ध झाले आहे की कांदा-लसूण रक्तदाब व कोलेस्टेरॉल कमी करतात. जीवाणू, विषाणू व किटाणू यांना ठार करतात. प्रतिकार शक्ती वाढवितात, असे सर्व काही फायदे असले तरीही ते तामसिक आहेत. इलेक्ट्रो-एनेसेफलोग्राम दाखविते की, कांदा-लसूण, मनुष्यांचा रिॲक्शन टाइम (परिस्थिती अनुसार प्रतिसाद देण्याकरिता लागणारा वेळ) खूपच वाढवितात. त्यामुळे विमानाच्या पायलटला उड्डाणाच्या पाच तास अगोदर कांदा-लसूण खाऊ नये अशा सूचना असतात. आपण सर्व गुप्त वॉरियर्स आहोत. साक्षात शिवबाबांचा एव्हर रेडी व अलर्ट असा हुकुम आहे. त्याशिवाय तामसिक अन्न मनाच्या वासना वाढवितात. काम, क्रोध तर वाढवतातच पण आळस खास करून अमृतवेलेला वाढतो. **शिवबाबांचे तर फर्मान आहे, 'क्रोधजीत, मायाजीत व कामजीत बना'. आता तुम्हीच ठरवा काय करायचे आहे? मुख्य म्हणजे स्वतः प्रयोग करीत रहा, अनुभव घेत चला, खात्री निर्माण करा आणि करवा.** ❖❖❖

---

▶ पान क्र. २८ वरून

**ही मनुष्य सृष्टी होरपळून निघत आहे. ज्याप्रमाणे गोरा कुंभाराच्या पेटलेल्या आव्यातही मांजरीची पिल्ले सुरक्षित राहिली, तद्वतच या कलियुगी विकारांच्या अग्नीत आपणा सर्वांना परमात्म्याने सुरक्षित ठेवले असतानाही आपणास बेहदचे वैराग्य का येत नाही?** सुमारे पाच हजार वर्षापूर्वी स्वर्गात निवास करणाऱ्या व अल्पकाळातच पुन्हा सत्ययुगी स्वर्गात आपले दैवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या होवनहार देवी-देवतांनो, आपण बेहदचे वैरागी व संन्यासी झालात तर या बेहद विश्वाचे अधिपती आपणच होणार आहात हा दृढ निश्चय करा. **रामराज्याचे अधिपती होणे हा कल्पातील रावणराज्यावर प्राप्त केलेला महान विजय असेल. म्हणूनच समयानुसार आता प्रत्येक ब्रह्मावत्साला बेहदचे वैराग्य यायला हवे.** ❖❖❖



**पणजी (गोवा) :** महाशिवरात्री निमित्त शिवध्वज फडकविल्यानंतर शिवस्मृतीत उभे आहेत गोव्याचे राज्यपाल श्री. भारतवीर वांचू, कमिशनर डॉ. मेसाक्किटा, बी. के. शोभा व सुरेखा बहेन




**सायन :** रिजुव्हिनेट मेडीकल माइन्डस या विषयावरील स्नेह संमेलनात डॉ. अशोक मेहता, डॉ. अरूण जामकर, बी. के. शिवानी बहेन, बी. के. रमेश भाई व बी. के. संतोष दीदी.



**जळगांव :** परिवहन व्यवस्थेविषयक सेमीनारचे उद्‌घाटन करतांना परिवहन राज्यमंत्री श्री. देवकर, डॉ. बच्छाव, बी. के. सुरेश भाई व बी. के. मीनाक्षी बहेन.



**औरंगाबाद :** फ्युचर ऑफ पॉवर या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना राज्यमंत्री श्री. राजेश टोपे, उद्योगपती बी. के. निझार भाई, राजयोगिनी संतोष दीदी, जयंती बहेन व अन्य.



**शांतीवन (आबूरोड) :** रेडिओ मधुबनच्या स्मरणिकेचे विमोचन करतांना बी. के. करूणा भाई, बी. के. तुलसीभाई व अन्य.




**सायन :** महिला सुरक्षा अभियान चे उद्‌घाटन प्रसंगी बी. के. जयंती बहेन, राजयोगिनी संतोष दीदी, नलिनी दीदी, गोदावरी दीदी, बी. के. रमेश भाई व अन्य.



**बोरिवली :** जग की आशा नारी सुरक्षा या कार्यक्रमात उपस्थित पोलिस इन्स्पेक्टर मधुलिका ठाकुर, शिवसेना महिला प्रमुख साधना माने, बी. के. दिव्या बहेन, संगीता बहेन व अन्य.



**सोलापूर :** पोलिस उपायुक्त स्मार्तनाताई पाटील यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र. कु. सोमप्रभा बहेन, शेजारी महापौर अल्का राठोड व अन्य.